रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २८०
www.ramprahar.com
रविवार, २८ एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २




## महाराष्ट्रातील कांदा निर्यातीला केंद्राची परवानगी



**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने मोठा निर्णय घेत महाराष्ट्रातील कांदा निर्यातीला परवानगी दिली आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात कांदा पिकवला जातो. महाराष्ट्र राज्य हे कांदा निर्यातीसाठी मोठा पुरवठादार राज्य मानले जाते. कांदा निर्यातीवर बंदी घातल्याने शेतकऱ्यांना योग्य दर मिळत नव्हते. हे लक्षात घेत केंद्र सरकारने महाराष्ट्रातील कांदा निर्यात करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. आता श्रीलंका, भुतान, बांगलादेश, बहरिन, युएई, मॉरिशस या देशांमध्ये कांदा निर्यात करण्यास केंद्र सरकारने परवानगी दिली आहे. जवळपास ९९ हजार १५० मेट्रीक टन कांद्यांची निर्यात करण्यास सरकारने परवानगी दिल्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

# काँग्रेस, इंडिया आघाडीचे नेते गोंधळलेले

## ■ पंतप्रधान नरेंद्र मोदींचा कोल्हापूरच्या सभेत निशाणा





**कोल्हापूर : प्रतिनिधी**

काँग्रेस आणि इंडिया आघाडीचे नेते पहिल्या दोन टप्प्यानंतर गोंधळले आहेत. आता ते ध्रुवीकरणाची भाषा बोलू लागले आहेत. जर देशात काँग्रेस आघाडीचे सरकार आले तर ते जम्मू-काश्मीरमध्ये कलम ३६० पुन्हा लागू करण्याच्या विचारात आहेत तसेच सीएए कायदादेखील त्यांना रद्द करायचा आहे, पण मला त्यांना एक सांगायचे आहे ज्यांचे तीन अंकी आकड्याचे खासदार निवडून आणण्याचे वांदे झाले आहेत, ते सरकारच्या दारापर्यंत तरी पोहचू शकतात का, असा खडा सवाल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. २७) विरोधकांना केला. ते कोल्हापूर येथे जाहीर सभेत बोलत होते.

महायुतीचे हातकणंगले लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार धैर्यशील माने आणि कोल्हापूरचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान मोदींची सभा कोल्हापूरमधील तपोवन मैदानात झाली. या वेळी जगात भारी कोल्हापुरी असे म्हणत पंतप्रधान मोदींनी जोरदार फटकेबाजी केली. कोल्हापूरमध्ये फुटबॉल प्रसिद्ध आहे असे मला कळले. त्यामुळे फुटबॉलच्या भाषेतच सांगतो की, निवडणुकीच्या पहिल्या दोन टप्प्यानंतर एनडीए आणि भाजप २-०ने पुढे आहे, तर काँग्रेस आणि इंडिया आघाडी शून्यावर आहे, असे पंतप्रधानांनी म्हटले.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, आता दोन गोल झाल्यानंतर कोल्हापूरकडे तिसऱ्या गोलची जबाबदारी आली आहे. कोल्हापूरकर असा गोल करतील की, इंडिया आघाडी चारी मुंड्या चीत होईल. दुसरीकडे इंडिया आघाडीने देशविरोधी आणि द्वेषाच्या राजकारणाचे दोन सेल्फ गोल केले आहेत. यामुळे मोदी सरकारच पुन्हा एकदा येणार हे पक्के झाले आहे.

इंडिया आघाडीचे लोक आता देशावर राग काढत आहेत. कर्नाटक आणि तमिळनाडूमध्ये यांचे नेते दक्षिण भारताचे विभाजन करण्याची भाषा वापरत आहेत, पण ते शक्य आहे का? छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात अहद पेशावर, तहद तंजावर, हिंदवी स्वराज्य अशी घोषणा ज्या मातीत झाली, ती माती इंडिया आघाडीच्या मनसुब्यांना पूर्ण करून देईल का? त्यामुळे विभाजनवादी भाषा बोलणाऱ्यांना तुम्ही चोख प्रत्युत्तर द्या, असे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केले.

### विरोधक केवळ राजकारण करताहेत -उपमुख्यमंत्री फडणवीस

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही विरोधकांवर टीकेची तोफ डागली. कांदा निर्यातबंदी झाल्यानंतरही सातत्याने केंद्राने कांदा खरेदी केली तसेच संमतीही दिली. विरोधकांना शेतकऱ्यांशी घेणेदेणे नाही. आपला एक मुद्दा संपला याचे त्यांना दुःख आहे. त्यांना केवळ राजकारण करायचे आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, लोकांची मागणी होती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कोल्हापूरला सभा झाली पाहिजे. त्यामुळे ही सभा घ्यावी, अशी विनंती मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनीही केली. कोल्हापूर असो किंवा इतर मतदारसंघ भाजप महायुतीला चांगले यश मिळेल.

### उबाठाची पूर्ण काँग्रेस झालीय -मुख्यमंत्री शिंदे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या भाषणात म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते काँग्रेससोबत जावे लागेल, त्या वेळी माझे दुकान बंद करेन, पण त्याच ठाकरेंचा मुलगा आज काँग्रेसला मतदान करणार आहे. जनाची नाही, पण मनाची तरी लाज ठेवली पाहिजे होती. उबाठाची आता पूर्ण काँग्रेस झाली आहे. ज्या गोष्टीची लाज वाटायला हवी होती त्याचा अभिमान बाळगत आहेत. आपण भाग्यवान आहोत की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्याला भेटले आहेत. अब की बार ४००पारमध्ये कोल्हापूरचे दोन खासदार पाहिजेत.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी या देशाच्या विकासासाठी, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान मजबूत करण्यासाठी काम करीत आहेत. कोण म्हणतो संविधान बदलणार आहे. याद राखा! जो कोणी असे म्हणेल त्याचे थोबाड आम्ही फोडल्याशिवाय राहणार नाही.**

**-रामदास आठवले, केंद्रीय राज्यमंत्री तथा अध्यक्ष, रिपाइं**



# खासदार श्रीरंग बारणे यांनी घेतले उरणकरांचे आशीर्वाद

## दौऱ्यास प्रतिसाद; आमदार महेश बालदी यांची उपस्थिती



(अधिक छायाचित्र पान ८ वर..)

**उरण : वार्ताहर**

लोकसभा निवडणुकीचे दोन टप्पे झाल्यानंतर आता पुढील टप्प्यांसाठी प्रचाराला वेग आला आहे. मावळ मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांचा झंझावाती प्रचार दौरा सुरू आहे. या अंतर्गत शनिवारी (दि. २७) उरण भेट दौरा आणि बाईक रॅलीचे आयोजन उरण मतदारसंघात करण्यात आले होते. त्यास उत्तम प्रतिसाद लाभला.

या रॅलीत महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे व आमदार महेश बालदी यांच्यासह भाजपचे तालुकाध्यक्ष रविशेठ भोईर, जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत घरत, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष परीक्षित ठाकूर, भाजपचे शहराध्यक्ष कौशिक शाह, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे, सरचिटणीस निर्मला घरत, शहराध्यक्ष संपूर्णा थळी, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, राजेश ठाकूर, हितेश शाह, हस्तीमल मेहता, अजित भिंडे, चंद्रकांत गायकवाड, पुरुषोत्तम सेवक, अरुणा म्हात्रे, करळ सरपंच अनिता तांडेल, उपसरपंच तेजश्री कडू, जितेंद्र घरत, देवानंद तांडेल, निकेतन कडू, जितेंद्र ठाकूर, प्रमोद म्हात्रे यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बाईक रॅलीला तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ठिकठिकाणी खासदार बारणे यांचे स्वागत करण्यात आले, तर महिलांनी औक्षण केले.

## निवडक

### एफएसआय घोटाळाप्रकरणी शशिकांत शिंदेंवर गुन्हा दाखल

**नवी मुंबई :** महाविकास आघाडीचे सातारा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्यावर पोलिसांनी आर्थिक फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल आहे. शौचालय घोटाळ्याचा गुन्हा दाखल असतानाच एफएसआय प्रकरणात दुसरा गुन्हा दाखल झाल्याने शिंदे यांना अटक होण्याची शक्यता आहे. एपीएमसी पोलीस ठाण्यात २४ संचालक आणि सचिव अशा एकूण २५ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मसाला मार्केटमधील ४६६ गाळेधारकांना जादाचा एमएसआय देताना कमी दर आकारल्याने एपीएमसी प्रशासनाचे ६५ कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. **(सविस्तर पान २ वर..)**

### हेमंत सोरेन यांचा जामीन अर्ज ईडी कोर्टाने फेटाळला

**रांची :** झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना जमीन घोटाळा प्रकरणात तात्पुरता जामीन देण्यास शनिवारी (दि.२७) ईडी कोर्टाने नकार दिला. ते सध्या होटवार जेलमध्ये आहेत. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर कोर्टाने सोरेन यांची याचिका फेटाळून लावली.

# महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाने एकाही अल्पसंख्याक व्यक्तीला उमेदवारी दिलेली नाही हे दुर्दैव

## ज्येष्ठ नेते नसीम खान यांचा घरचा आहेर



**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नसीम खान हे उत्तर-मध्य लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी न मिळाल्यामुळे प्रचंड नाराज झाले आहेत. त्यांनी जाहीरपणे आपली नाराजी व्यक्त केल्यानंतर शनिवारी (दि. २७) मुंबईत पत्रकार परिषदेत आपली भूमिका मांडली.

प्रत्येक निवडणुकीत काँग्रेसची भूमिका राहिली आहे की, प्रत्येक जाती-धर्माला न्याय मिळाला पाहिजे, पण दुर्दैव आहे की महाराष्ट्रात यंदा काँग्रेसने अल्पसंख्याक समाजाच्या एकाही व्यक्तीला उमेदवारी दिलेली नाही. त्यामुळे अल्पसंख्याक समाजात नाराजी आहे. राज्यातून अनेकजण मला फोन करून रोष व्यक्त करीत आहेत. तुम्ही वरिष्ठ नेते असताना काय अडचण आहे की तुम्हाला एकही उमेदवार देता आला नाही, असा सवाल मला अनेकजण विचारत आहेत, असे नसीम खान यांनी सांगितले.

या वेळी नसीम खान यांना एमआयएम पक्षाने दिलेल्या प्रस्तावाविषयी विचारण्यात आले. त्यावर नसीम खान यांनी म्हटले की, मला याबाबत काहीही भाष्य करायचे नाही. माझ्याविषयी सहानुभूती दर्शविली त्यासाठी मी धन्यवाद देतो. यापेक्षा अधिक मला बोलायचे नाही.

दरम्यान, नसीम खान आता खरोखरच काँग्रेसचा प्रचार करणार नाही की, वरिष्ठ त्यांना समजवणार हे पाहणे महत्त्वाचे असेल.

### ॲड. उज्ज्वल निकम यांना भाजपकडून उमेदवारी

#### मुंबई उत्तर-मध्यमधून तिकिट

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई उत्तर-मध्य लोकसभा मतदारसंघातून भाजपने ज्येष्ठ विधीज्ञ उज्ज्वल निकम यांना उमेदवारी जाहीर केली आहे. या जागेवरून महाविकास आघाडीने वर्षा गायकवाड यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे आता गायकवाड विरुद्ध निकम अशी येथे लढत होणार आहे.



२६/११च्या मुंबई हल्ल्यामध्ये उज्ज्वल निकम यांनी विशेष सरकारी वकील म्हणून काम पाहिले होते. यामधील एकमेव जिवंत हाती आलेला दहशतवादी अजमल कसाब याला फाशीपर्यंत पोहोचवण्यात त्यांची मोठी भूमिका होती. ॲड. निकम यांनी तत्पूर्वी अनेक महत्त्वाच्या खटल्यांमध्ये सरकारी वकील म्हणून काम केले आहे. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. देशाची प्रतिमा जगभरात उंचावली आहे याचे सगळे श्रेय पंतप्रधान मोदींचे आहे, असे सांगून देशात जे नवे कायदे येतील, ते लोकहिताचे कसे असतील हे पाहण्याचा माझा प्रयत्न असेल, असे ॲड. निकम म्हणाले.

# जितेंद्र आव्हाडांनी शेअर केला फेक व्हिडीओ

## निवडणूक आयोगाकडून होणार कारवाई

**ठाणे : प्रतिनिधी**

देशभरात शुक्रवारी दुसऱ्या टप्प्यातील मतदान पार पडले, मात्र या निवडणुकीत काही ठिकाणी गोंधळ झाल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. अशातच गेल्या वर्षभरापासून हिंसाचार सुरू असलेल्या मणिपूरमधील एक व्हिडीओ खासदार शरद पवार गटाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांनी पोस्ट केला होता. त्यावर आता निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण देत कारवाई करणार असल्याचे म्हटले आहे.

१९ एप्रिल रोजी लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदानादरम्यान मणिपूरमधील मतदान केंद्रावर हिंसाचार आणि तोडफोड झाली होती. त्यानंतर निवडणूक आयोगाने फेरमतदान घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार २२ एप्रिल रोजी या मतदारसंघात चोख बंदोबस्तामध्ये पुन्हा मतदान झाले, मात्र जितेंद्र आव्हाड यांनी या संदर्भातील एक पोस्ट करीत कोणतेही बटन दाबल्यानंतर कमळालाच मत जात असल्याचे म्हटले. यासोबत त्यांनी एक व्हिडीओदेखील पोस्ट केला होता, ज्यामध्ये काही महिला मतदान केंद्रावर तोडफोड करताना दिसत होत्या.

'मणिपूरमध्ये महिलांनी कोणतेही बटन दाबल्यानंतर फक्त कमळच छापलेले दिसत असल्याचे पाहून ईव्हीएम मशीन फोडले. सुप्रीम कोर्टाने या प्रकरणी तत्काळ हस्तक्षेपासाठी आवाहन करतो. इतर पक्षाचे चिन्ह छापलेले पाहून भाजप कार्यकर्त्यांना राग येतो असे का होत नाही?,' अशी पोस्ट जितेंद्र आव्हाड यांनी केली होती.

यावर मणिपूर निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण दिले आहे. 'फेक न्यूज : येथे दिसणारा व्हिडिओ हा इम्फाळ पूर्वेतील एका मतदान केंद्रात (३/२१ खुराई विधानसभा) जमावाच्या हिंसाचाराचा आहे आणि त्या मतदान केंद्रावर २२ एप्रिल रोजी फेरमतदान आधीच झाले आहे. व्हीव्हीपॅटद्वारे आलेल्या पेपर स्लिपमध्ये आणि बॅलेट युनिटवर दाबलेल्या बटणाचे चिन्ह जुळत नसल्याचा आरोप कोणीही केलेला नाही किंवा सापडला नाही. फेक न्यूज पसरवल्याबद्दल कायदेशीर कारवाई केली जात आहे,' असे मणिपूर निवडणूक आयोगाने त्यांच्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

# इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची केंद्रनिहाय सुसज्जता

## ■ निवडणूक निरीक्षक, जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती



**रायगड : रामप्रहर वृत्त**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी रायगड मतदारसंघ अंतर्गत अलिबाग विधानसभा क्षेत्रातील मतदान प्रक्रियेसाठी प्राप्त इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची मतदान केंद्रनिहाय सुसज्जता (कमिशनिंग) शनिवारी (दि.२७) पूर्ण करण्यात आली.

अलिबाग येथील जेएसएम महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र कमिशनिंगवेळी निवडणूक निरीक्षक संजीव कुमार झा (सर्वसाधारण), जोयस लालरेम्मवी (पोलीस), जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, उपविभागीय अधिकारी मंगेश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅटची कमिशनिंग ही एक प्रक्रिया आहे, ज्यामध्ये मतदान यंत्र घटक योग्य कार्य करीत आहेत याची खात्री करण्यासाठी चाचणी केली जाते. या प्रक्रियेत नियोजन, निवडणूक उमेदवार-चिन्ह, मतदान केंद्रनिहाय प्रमाणीकरण सुसज्जता समाविष्ट आहे. यंत्र घटक जसे पाहिजे तसे काम करीत आहेत याची खात्री करणे हादेखील उद्देश आहे.

प्रक्रिया पूर्ण करून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्हीव्हीपॅट स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात आली. स्ट्राँग रूमच्या सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने पॉवर बॅकअप, सशस्त्र बंदोबस्त आराखडा, पोलीस आदी व्यवस्था करण्यात आली आहे.

### सलमान खान गोळीबारप्रकरणी आरोपींना 'मोक्का'

**मुंबई : प्रतिनिधी**

बॉलीवूड अभिनेता सलमान खान याच्या घरावर झालेल्या गोळीबार प्रकरणानंतर आरोपींवर मोक्का लावण्यात आला आहे.

अभिनेता सलमान खानच्या घरावर १४ एप्रिलच्या पहाटे गोळीबार झाला. या वेळी सलमान कुटुंबासोबत घरातच होता. गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई याचा भाऊ अनमोल बिश्नोई याने या गोळीबाराची जबाबदारी स्वीकारली. लॉरेन्स बिश्नोई हा सध्या जेलमध्ये असून त्याचा भाऊ अनमोल अमेरिकेत आहे आणि तिथून तो भारतामध्ये गुन्हेगारीच्या घटना घडून आणत आहे. पोलिसांनी बिश्नोई बंधूंसह विक्की गुप्ता, सागर पाल यांच्यावर मोक्का लावला आहे.

### मतदान जनजागृती



**पनवेल : लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मावळ मतदारसंघातील पनवेल विधानसभा मतदारसंघात भीमनगर झोपडपट्टी येथे महापालिकेच्या वतीने मतदान जनजागृती करण्यात आली.** **(वृत्त पान ३ वर..)**

# काँग्रेसने जनतेला फक्त चॉकलेट दाखवले

## ▪ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची टीका

**सांगली : प्रतिनिधी**

सांगली लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार संजय पाटील यांच्या प्रचाराची सभा शनिवारी (दि. २७) पार पडली. या सभेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित करताना विरोधकांवर हल्लाबोल केला. काँग्रेसने अनेक वर्षे राज्य केले, पण जनतेला फक्त चॉकलेट दाखवले, अशी खोचक टीका त्यांनी केली.



सांगलीमध्ये संजयकाका पाटील यांच्यासह अजून काही उमेदवार उमेदवार आहेत. या उमेदवारांची ही निवडणूक नाही. या निवडणुकीत दोनच पर्याय आहेत. एक पर्याय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि दुसरा पर्याय राहुल गांधी आहेत. एकीकडे आपली महायुती, तर दुसरीकडे राहुल गांधींकडे २६ पक्षांची खिचडी आहे. ही लढाई दोन व्यक्तिमत्वांमधील आहे. आपल्याकडे नरेंद्र मोदी यांच्यासारखे मजबूत इंजिन आहे. त्या इंजिनबरोबर वेगवेगळ्या पक्षांचे डब्बे लावले आहेत. ही आपल्या विकासाची ट्रेन आहे. या विकासाच्या ट्रेनमध्ये गोरगरीब, शेतकरी, शेतमजूर आहेत. महायुतीची ही गाडी सबका साथ सबका विकास म्हणत पुढे चालली आहे. विरोधकांकडे काय अवस्था आहे, असा हल्लाबोल उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी केला.

काँग्रेसच्या सरकारने अनेक वर्षे राज्य केले. आघाडीच्या अनेक मंत्र्यांनी मंत्रिपदे भोगले, पण जनतेला फक्त चॉकलेट दिले. दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ८० कोटी नागरिकांना मोफत धान्य देण्याचे काम केले, असे उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

आता दहा वर्षांनंतर दाव्याने सांगतो की, ६० वर्षांचा त्यांचा इतिहास काढा आणि १० वर्षांचा मोदींचा कार्यकाळ काढा. साखर कारखान्यांसाठी आणि उसाच्या शेतकऱ्यांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जेवढे निर्णय घेतले, तेवढे आजपर्यंतच्या इतिहासात कधीही झाले नव्हते, असेही त्यांनी म्हटले.

# आमदार शशिकांत शिंदे अडचणीत

## एपीएमसीतील एफएसआयप्रकरणी गुन्हा दाखल

**नवी मुंबई : बातमीदार**

महाविकास आघाडीचे सातारा लोकसभेचे उमेदवार शशिकांत शिंदे यांच्यावर आर्थिक फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल आहे. शौचालय घोटाळ्याचा गुन्हा दाखल असतानाच एफएसआय प्रकरणात दुसरा गुन्हा दाखल झाल्याने शशिकांत शिंदे यांना कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

एपीएमसी पोलीस ठाण्यात २४ संचालक आणि सचिव अशा एकूण २५ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मसाला मार्केटमधील ४६६ गाळे धारकांना जादाचा एमएसआय देताना कमी दर आकारल्याने एपीएमसी प्रशासनाचे ६५ कोटींचे नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी आमदार महेश शिंदे यांनी विधानसभेत आवाजदेखील उठवला होता. अखेर याप्रकरणी तथ्य आढळल्याने हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२००९साली मसाला मार्केटमधील ४६६ गाळेधारकांना जादाचे बांधकाम करण्यासाठी ६०० रु. प्रतिचौरस फुटाने परवानगी त्या वेळच्या संचालक मंडळाने दिली होती. रेडीरेकनरचा दर तीन हजार ६६ रु. असताना फक्त ६०० रु. आकारले गेल्याने शासनाचे ६२ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

नवी मुंबई एपीएमसी फळ मार्केट शौचालय टेंडर घोटाळ्याप्रकरणी याआधी आमदार शशिकांत शिंदे यांना अंतरिम जामीन मिळाला आहे. संचालक संजय पानसरे यांना अटक झाली आहे, तर इतर संचालकांवर अटकेची टांगती तलवार आहे.

# फरार चोरट्यांना मुरूड पोलिसांकडून अटक

**मुरूड** : मुरूड पोलीस ठाण्यात काही वर्षांपूर्वी एका चोरीच्या गुन्ह्यात अडकलेले दोन आरोपी जामिनावर सुटले होते, परंतु कोणत्याही सुनावणीला हजर न राहिल्याने अखेर न्यायालयाने त्यांच्या अटकेचे आदेश काढला होता. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून या दोन्ही चोरट्यांना अटक केली आहे.

आरोपी माणिक तानाजी सावंत (वय ५३), नशिर नबीलाल सय्यद (वय ४०) हे दोन्ही आरोपी सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील दिवड येथील राहणारे होते. २००५पासून हे आरोपी फरार असल्याने त्यांचा मुरूड पोलीस कसून शोध घेत होते. नुकतीच पोलिसांना एका गुप्त माहितीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाल्यावर पोलिसांनी आरोपींना पकडण्यासाठी सापळा रचला. मुरूड पोलीस निरीक्षक निशा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संदीप पडवळ, हवालदार खेळू शीद, पोलीस नाईक गणेश डोंगरे यांनी आरोपींना शिताफीने अटक केली.

# पनवेल मनपाकडून शाळापूर्व तयारी अभियानाला प्रारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शाळापूर्व तयारी अभियानांर्गत मेळावा आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये उत्साहात घेण्यात आला.



या अभियानांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५मध्ये इ. पहिली व पुढील वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा मोफत प्रवेश व त्यांच्या स्वागताचा हा कार्यक्रम घेण्यात आला. मुलांनी नियमित शाळेत यावे आणि उत्तम शिक्षण घ्यावे, विद्यार्थ्यांना शाळेची आवड निर्माण व्हावी त्यासाठी पोषक वातावरण तयार करणे हा अभियानाचा मुख्य उद्देश्य आहे. पनवेल महापालिका शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण व अधीक्षक किर्ती महाजन यांनी शाळा पूर्वतयारी या अभियानांतर्गत १० शाळांतील मेळाव्यास भेट दिली.

या मेळाव्यांतर्गत पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना गुलाबपुष्प व चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. या वेळी शिक्षणाधिकाऱ्यांनी उपस्थित पालकवर्ग व शिक्षकांना संबोधित केले, तसेच शाळेची गुणवत्ता व पटसंख्या वाढविण्याच्या दृष्टीने येत्या शैक्षणिक वर्षात शिष्यवृती वर्ग नियमित चालू ठेवण्याचे आदेश दिले, तसेच स्पर्धा परीक्षांच्या माध्यंमातून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीस लागेल, असा विश्वास व्यक्त करून शिक्षकांना नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचा भाग म्हणून शिक्षकांनी विविध शैक्षणिक स्टॉल मांडले होते. यामध्ये विद्यार्थी नोंदणी, भाषा विकास, शारीरिक विकास, बौद्धिक विकास, सामाजिक व भावनिक विकास, गणनपूर्व तयारी मार्गदर्शन आदी स्टॉलला विद्यार्थी व पालकांनी भेट दिली.

यानिमित्ताने संपूर्ण शाळेला रांगोळी काढण्यात आली होती, वेगवेगळ्या प्रकारच्या टोप्या, सेल्फी पॉईंट तयार करून नवीन विद्यार्थी व पालकांना आकर्षित करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी १० शाळेतील सर्व शिक्षकवृंदांनी योगदान दिले.

# रेल्वेस्थानकांवर आरपीएफची पथके नेमण्याचे निर्देश

**ठाणे :** मुंबई शहराची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकलगाड्यांमधून निवडणुक काळात रोख रकमेची वाहतूक होण्याची शक्यता असते. असे प्रकार रोखण्यासाठी रेल्वेस्थानकांवर आरपीएफची पथकाची नेमणूक करण्याचे निर्देश केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षकांनी ठाणे जिल्ह्यातील निवडणूक अधिकाऱ्यांना बैठकीत दिले. मतदानाचे शेवटचे चार दिवस हे अतिशय महत्त्वाचे असून या दिवसांत आरपीफची कुमक वाढवावी, अशी सूचनाही त्यांनी दिली आहे.

ठाणे जिल्ह्यातील ठाणे, भिवंडी आणि कल्याण लोकसभा मतदारसंघातील निवडणुकांसाठी २० मे रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन येथे निवडणूक खर्चाच्या अनुषंगाने आढावा बैठक आयोजित केली होती. या बैठकीस भिवंडी मतदारसंघाचे केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक चित्तरंजन मांझी, कल्याण मतदारसंघाचे केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक नकुल अग्रवाल, ठाणे लोकसभा मतदारसंघाचे केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षक चंद्र प्रकाश मीना आणि राहील गुप्ता उपस्थित होते. या बैठकीत केंद्रीय निवडणूक खर्च निरीक्षकांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

# समर्पित भावनेने कार्य केल्याने यशस्वी -डॉ. अनिलकुमार गायकवाड



**मुंबई : प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम विभागाची परीक्षा उत्तीर्ण होऊनही केवळ जलसंधारण विभागात कनिष्ठ अभियंता असल्याने मला सार्वजनिक बांधकाम विभागात घेतले नाही, परंतु या खात्यात यायचेच, असा निर्धार करून प्रयत्नांची पराकाष्ठा केली. सकारात्मक प्रयत्न केले आणि सार्वजनिक बांधकाम विभागात सेवा दाखल झालो. समर्पित भावनेने कार्य करीत या खात्यात सर्वोच्च पद मिळाले असले, तरी त्यामागे मोठा संघर्ष आहे, असे मत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. अनिलकुमार गायकवाड य़ांनी जीवन गौरव पुरस्कार स्वीकारताना आपले भावपूर्ण मनोगत व्यक्त केले.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद, अखिल भारतीय मुस्लिम विकास परिषद, अग्रसेन टाईम्स, विक्रांद टाईम्स, शारदा ट्रस्ट, शारदा पब्लिसिटी संकल्प फाउंडेशन, पुरोगामी प्रकाशन आणि गोल्डनपेज पब्लिकेशन या वृत्तपत्रीय तथा सामाजिक संस्थांच्या वतीने डॉ. अनिलकुमार गायकवाड यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. या प्रसंगी ते बोलत होते. त्यांना भव्य अशी संविधान उद्देशिकेची प्रतिमा तथा मानपत्र देण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे हे होते. या प्रसंगी व्यासपीठावर महानंदचे संचालक कान्हुराज बगाटे, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष एम. डी. शेख, तथा ज्येष्ठ पत्रकार अरुणकुमार मुंदडा, राज्याच्या अल्पसंख्यांक आयोगाचे माजी अध्यक्ष मुनाफ हकीम तसेच माजी जिल्हा माहिती अधिकारी युनूस आलम सिद्दकी उपस्थित होते.

# देश तोडण्याचे आणि लुटण्याचे काँग्रेसचे मनसुबे उघड झालेत -ना. रामदास आठवले

**मुंबई : प्रतिनिधी**

काँग्रेसचे सल्लागार सॅम पित्रोदा यांनी अमेरिकेचा वारसा कायदा काँग्रेसने भारतात लागू करण्याचा काँग्रेसला सल्ला दिला आहे. त्यानुसार सामान्य माणसाने मोठ्या कष्टाने कमवलेली संपत्ती त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या वारसांना न देता त्यातील ५५ टक्के संपत्ती शासनाने ताब्यात घेण्याचा अमेरिकेचा कायदा भारतात राबविण्याचे काँग्रेसचे स्वप्न आम्ही कधी पूर्ण होऊ देणार नाही, असे रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय



राज्यमंत्री रामदास आठवले यांनी म्हटले आहे.

देशवासीयांना लुटण्याचा काँग्रेसचा इरादा पित्रोदा यांनी उघड केला आहे. सत्तेत असताना भ्रष्टाचार करून देशाला लुटण्याचा आणि आता मृत्यूनंतर ही सामान्य माणसाची संपत्ती लुटण्याचा अजब अमेरिकी कायदा आपल्या देशात लागू करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या काँग्रेसच्या बेछूट वृत्तीचा आम्ही तीव्र निषेध करतो, असे ना. आठवले म्हणाले.


दक्षिण गोव्याचे काँग्रेसचे उमेदवार कॅप्टन विरियटो फर्नांडिस यांनी गोव्यात भारतीय संविधान जबरदस्ती लागू आहे. त्यांना भारतीय संविधान लागू करू नका आणि त्यांना दुहेरी नागरिकत्व द्यावे ही केलेली मागणी देशात फूट पडणारी आहे. राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेतून भारत तोडोची बीजे पेरली का? त्याचे परिणामस्वरूप गोव्यात काँग्रेस उमेदवार संविधानविरोधी गरळ ओकत आहे. काहीही बरळत आहेत. आपल्या भारत देशाला एकच संविधान आहे.

जगातील सर्वश्रेष्ठ संविधान आहे. मग गोव्याला भारतीय संविधान नको, दुसरे संविधान पाहिजे, ही काँग्रेस उमेदवारांची मागणी काँग्रेसचा संविधानविरोधी चेहरा उघड करीत आहे, असा आरोपही ना. रामदास आठवले यांनी केला आहे.

# शास्त्रज्ञांनी मिळवली सूर्याची रेडिओ प्रतिमा

**पुणे : प्रतिनिधी**

राष्ट्रीय रेडिओ खगोलभौतिकी केंद्रातील (एनसीआरए) संशोधकांच्या नेतृत्वाखालील सौर भौतिक शास्त्रज्ञांच्या टीमने दक्षिण आफ्रिकेतील मीरकॅट रेडिओ दुर्बिणीच्या सहाय्याने सूर्याची सखोल रेडिओ प्रतिमा तयार केली. या प्रतिमेतून सूर्याची अचूक आणि लहान वैशिष्ट्ये दिसून आली. मीरकॅट दूरदर्शकद्वारे झालेली ही सूर्याची पहिली निरीक्षणे असून, येत्या काळात सौर भौतिकशास्त्रात एक नवीन दालन खुले होण्याची अपेक्षा आहे.



दक्षिण आफ्रिकेच्या कारू वाळवंटात उभारलेले मीरकॅटनामक रेडिओ दूरदर्शक संकुलाद्वारे आगामी स्क्वेअर किलोमीटर रे वेधशाळेच्या मध्य-रेडिओ लहरी वर्णपटात निरीक्षणे केली जातात. या संकुलात आठ किमी त्रिज्येच्या परिसरात १३.५ मीटर व्यासाचे ६४ रेडिओ दूरदर्शक उभारलेले आहेत. हे दूरदर्शक गिगाहर्ट्झ कंपन संख्येच्या रेडिओ लहरींवर निरीक्षणे करतात. या वर्णपटात सूर्याचे निरीक्षण करत अत्यंत कमी वेळेत प्रतिमा निर्माण करणारी ही जगातील सर्वोत्तम दूरदर्शक सुविधा मानली गेली आहे. सूर्याचा प्राचीन काळापासून अभ्यास सुरू असला, तरी आजही त्याची अनेक रहस्य उलगडलेली नाहीत. या पार्श्वभूमीवर सूर्याची रेडिओ प्रतिमा मिळवणे महत्त्वाचे मानले जात आहे.

रेडिओ दूरदर्शकातून आकाशातील सर्वांत तेजस्वी स्रोत असलेल्या सूर्याच्या निरीक्षणासाठी विशेष काळजी घेणे आवश्यक असते. त्यासाठी निरीक्षण तंत्र विकसित करण्यात आले. या तंत्राद्वारे दूरदर्शकातून थेट सूर्याकडे निरीक्षण करण्याऐवजी दूरदर्शकाला सूर्यापासून थोड्या अंतरावर स्थिर करण्यात आले, अशी माहिती प्रा. दिव्या ओबेरॉय यांनी दिली. रेडिओ तरंगलांबीवरील सूर्य एका सेकंदापेक्षा कमी वेळात आणि जवळच्या समान रंगाच्या छटांमध्येही खूप वेगळा दिसू शकतो.

त्यामुळे सूर्याची प्रतिमा मिळवण्यात अनेक प्रकारची गुंतागुंत आहे, असे प्रा. सुरजित मोंडल यांनी सांगितले.

# स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन शिबिर

**नवी मुंबई** : स्पर्धा परीक्षा या सर्वच प्रकारच्या करियर पर्यायांचा एक अविभाज्य भाग बनल्या आहेत. त्यामुळे सागरी भूमिपुत्रांसाठी विशेष करून मुंबई महानगर, परदेशात आगरी-कोळी युथ फाउंडेशनच्या आणि त्यांच्या काही संलग्न संस्थांच्या माध्यमातून ट्रेनिंग व्यवस्था निर्माण करण्यात येणार आहे. ७ मेपर्यंत १२वी पात्रतेसाठी तीन हजार ७१२ पदांसाठी www.ssc.gov.in या संकेतस्थळावर फॉर्म भरण्याची मुदत आहे. जून महिन्यात दहावी पात्रतेचे फॉर्म निघणार असून वर्षभरात हजारो नोकरीच्या संधी निघणार आहेत. मुंबई महानगर प्रदेशातील इच्छुक परिक्षार्थिंसाठीच्या ट्रेनिंग व्यवस्था निर्मितीच्या प्रयत्नाला प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मुरूडमध्ये स्थिर सर्वेक्षण पथक ॲक्शन मोडवर

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा सार्वत्रिक निवडणूक ७ मे रोजी होणार असून या निवडणुकीकरिता १३ उमेदवार रिंगणात आहेत. मतदानाला अवघे नऊ दिवस शिल्लक राहिल्याने प्रचारालाही वेग आला आहे.



या निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली असून कुठेही आचारसंहिता भंग होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी रायगड अलिबाग व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अलिबाग यांनी विविध ठिकाणी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी स्थिर सर्वेक्षण पथके तैनात करण्यात आली आहेत.

सध्या ही पथके ॲक्शन मोडवर आली असून प्रत्येक गाडीची सखोल तपासणी दिवस-रात्र सुरू केली आहे.

या वेळी भरारी पथक प्रमुख अमोल दोंदे, किरण देशमुख, पोलीस उपनिरीक्षक अतुल मडके, प्रकाश आरेकर, दत्ताराम नाईक, पोलीस शिपाई मनोज हंबीर, रितेश देशमुख, खेळू बांगर, स्थिर पथक राजेश वाडेकर, नंदकुमार आंबेतकर, रवींद्र सैंदाणे, वाघमारे आदींसह कर्मचारी उपस्थित असतात.

## दुखवटा

### दत्तात्रेय पाटील

**पनवेल** : तालुक्यातील कोंडले येथील माजी पोलीस पाटील दत्तात्रेय पांडुरंग पाटील (वय ७०) यांचे सोमवारी निधन झाले. ते भाजपचे रवींद्र पाटील यांचे वडिल होते. दशक्रिया श्री क्षेत्र नाशिक होणार असून उत्तरकार्य ५ मे राजी राहत्या घरी कोंडले येथे आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.



### कृष्णाजी कुलकर्णी

**खोपोली** : वरची खोपोली येथील ज्येष्ठ नागरिक संघाचे स्वयंसेवक आणि कर्नाटक संघाचे कार्यकर्ते कृष्णाजी भीमराव कुलकर्णी उर्फ आप्पा कुलकर्णी यांचे गुरुवारी (दि. २५) सकाळी ९.४५ वाजता त्यांच्या राहत्या घरी वयाच्या ९४व्या वर्षी वृद्धत्वाने निधन झाले. सायंकाळी अमरधाम येथे विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व संघ परिवारातर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली.



## निवडक

### अवजड वाहतूक बंद करण्याची मागणी

**मोहोपाडा :** रसायनी पाताळगंगा परिसरातील अतिरिक्त एमआयडीसीत अनेक कारखाने उभे राहात आहेत. त्यामुळे या ठिकाणी अवजड वाहनांची वर्दळ वाढली आहे. दांड-रसायनी रस्त्यावरील मोहोपाडा मुख्य रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी होत आहे. त्यामुळे परिसरातील अवजड वाहतूक बंद करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष राकेश खराडे यांनी केली आहे. मोहोपाडा थांब्यापासूनचा रस्ता अरुंद असल्यान कोंडीत भर पडत आहे. मोहोपाडा ते चांभार्ली या परिसरात नवीन बाजारपेठेसाठी एमआयडीसीने जागा उपलब्ध करून देण्याची गरज निर्माण झाली असल्याचे राकेश खराडे यांनी सांगितले.

### फुंडे हायस्कूलमध्ये सेवापूर्ती सोहळा



**उरण :** रयत शिक्षण संस्थेचे फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात चार सेवकांचा सेवापूर्ती सोहळा भावनिक वातावरणात शुक्रवारी (दि. २६) झाला. विद्यालयाचे पर्यवेक्षक एस.जी. म्हात्रे, कार्यालय प्रमुख एम. पी.तुमडे, ज्युनिअर कॉलेज प्राध्यापिका ज्योती कपडेकर, भांडारपाल सुरेखा घरत या सेवकांचा सेवापूर्ती सोहळा विद्यालयाच्या वतीने साजरा करण्यात आला. विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य एम. जी.म्हात्रे, स्कुल कमिटी सदस्य यशवंत ठाकूर, मिनाक्षी म्हात्रे, सर्व सेवक वृंद आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन संगीता म्हात्रे आणि दिप्ती सुतार यांनी केले.

### महागणपतीच्या दर्शनासाठी गर्दी



**उरण :** तालुक्यातील चिरनेर महागणपती क्षेत्रात संकष्ट चतुर्थी निमित्ताने शनिवारी (दि. २७) गणेशभक्तांनी पेशवेकालीन महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनाला सुरुवात झाली होती. या वेळी श्री महागणपतीच्या दर्शनासाठी नवविवाहित जोडप्यांनी आवर्जून हजेरी लावून, मनोभावे दर्शन घेतले. चिरनेर येथील गणपतीच्या मंदिराची निर्मिती पेशवे बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांच्या कारकिर्दीत झाली.

# रेशनिंग ग्राहकांना मिळाले धान्य!

## भाजपच्या माजी नगरसेविकांचा पाठपुरावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल, पनवेल शहरात रेशनिंगच्या दुकानाबाबतच्या समस्या भाजपच्या माजी नगरसेविकांनी आपापल्या प्रभागात तातडीने मार्गी लावून लाभार्थ्यांना दिलासा दिला आहे.

पनवेल शहरातील रेशन दुकान क्रमांक १५ हे मागील बऱ्याच दिवसांपासून बंद होते. ही बाब एका ग्राहकाने माजी नगरसेविका दर्शना भोईर यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांनी लगेचच पुरवठा अधिकारी कांबळे यांना सांगितली.



त्यानंतर १० ते १५ मिनिटांमध्ये रेशन दुकान सुरू करण्यात आले.



याचप्रमाणे नवीन पनवेल ए टाईप विभागामध्ये रेशनिंगच्या दुकानावर लोकांना धान्य मिळत नव्हते. त्यावेळी माजी नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे यांनी पुरवठा अधिकारी कांबळे यांना त्वरित तेथे बोलावून रॅशिंगचे दुकान उघडून सर्व ग्राहकांना धान्य देण्यासाठी आपण भाग पाडले. ज्यांचे उत्पन्न हे साठ हजार किंवा त्याहून अधिक आहे अशा लोकांना सोमवारी रेशनिंगच्या दुकानातच फॉर्म उपलब्ध करून देऊन त्यांचे उत्पन्न कमी दाखवण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत आणि सर्वांना धान्य कसे मिळेल यासाठी आपल्याकडून प्रयत्न करणार आहोत, असे वाघमारे यांनी या वेळी सांगितले.

## बनावट इन्स्टाग्राम अकाऊंटद्वारे प्रेयसीचे अश्लील फोटो व्हायरल

**पनवेल : वार्ताहर**

अल्पवयीन असलेल्या प्रेयसीने प्रेमसंबंध तोडल्याने संतप्त झालेल्या प्रियकराने आपल्या प्रेयसीच्या नावाने बनावट इन्स्टाग्राम अकाऊंट तयार करून त्यावरून तिच्या सोबतचे आक्षेपार्ह व अश्लील फोटो व्हायरल केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. अनुराग मोरे (वय २२) असे या तरुणाचे नाव असून खांदेश्वर पोलिसांनी त्याच्या विरोधात विनयभंगासह पॉक्सो तसेच आयटी ॲक्ट व बदनामीकारक माहिती प्रसिद्ध केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणातील आरोपी अनुराग मोरे हा सोलापूर येथे राहण्यास आहे, तर १७ वर्षीय पीडित मुलगी नवीन पनवेल भागात राहण्यास असून सध्या ती शिक्षण घेत आहे. आरोपी अनुराग हा पूर्वी नवीन पनवेलमध्ये राहण्यास होता. त्या वेळी त्याने पीडित मुलीसोबत मैत्री करून तिच्यासोबत प्रेमसंबंध निर्माण केले होते, मात्र अनुराग हा पीडित मुलीवर नेहमी संशय घेऊन तिला मारहाण करत होता. त्याच्या या विक्षित वागण्यामुळे पीडित मुलीने त्याच्या सोबत संपर्क तोडला होता. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या अनुरागने पीडित मुलीच्या नावाने बनावट इन्स्टाग्राम



अकाऊंट सुरू केले. त्यानंतर त्याने पीडित मुलीसोबतचे अश्लील व आक्षेपार्ह फोटो तसेच मेसेज व्हायरल केले. अनुराग इतक्यावरच थांबला नाही, तर त्याने पीडित मुलीसोबतचे फोटो पीडित मुलीचे काका व वडिलांच्या व्हॉट्सॲपवर पाठवून तिची बदनामी केली.

या प्रकारानंतर पीडित मुलीने आपल्या आईवडिलांसह खांदेश्वर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी अनुगार मोरे याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. आरोपी सध्या सोलापूर येथे असल्याने अद्याप त्याला अटक करण्यात आली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, अल्पवयीन मुला-मुलींमध्ये प्रेम प्रकरणावरून फसवणूक करण्याच्या घटना वाढल्या आहेत. यासाठी अल्पवयीन मुलांमुलींमध्ये समोपदेशनाची गरज निर्माण झाली आहे.

## खारघरमध्ये आज उस्ताद अजीम खान स्वर श्रद्धांजली कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उस्ताद अजीम खान यांच्या पुण्य स्मरणार्थ एस. पी. आर हेल्थ वर्ल्ड प्रस्तुत उस्ताद अजीम खान स्वर श्रद्धांजली या कार्यक्रमाचे रविवार दिनांक २८ एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० वाजता खारघर येथे करण्यात आले आहे. सेक्टर १९मधील राज टॉवर येथे होणाऱ्या या कार्यक्रमात रायगड भूषण प. उमेश चौधरी आणि सिद्धी पटवर्धन यांचे शास्त्रीय गायन होणार आहे.



नागनाथ पाटील व आरती आवटे हे गुरुवंदना सादर करणार असून उस्ताद रफात खान आणि वैभव चौधरी यांचे सितार वादन होणार आहे. या वेळी गायनाला निशाद पवार, कौस्तुभ भाग्यवंत, ओमकार दातार, नागनाथ पाटील यांची साथसंगत लाभणार आहे. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून हभप निवृत्तीबुवा चौधरी, मंगला सिंग, संजय घरत, विनोद तोडेकर, नरेश रक्ताडे, महेश घाटे, विनायक प्रधान, राजलक्ष्मी संगीत आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत,

अशी माहिती या कार्यक्रमाच्या आयोजक एसपीआर हेल्थ वर्ल्डच्या संस्थापिका सुरेखा शिंदे यांनी दिली.

## खांदा वसाहतीमधून अल्पवयीन मुलाचे अपहरण

### खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

आई आणि वडीलांसोबत शाळेत गेलेला १४ वर्षीय मुलगा पुन्हा घरी परतलाच नसल्याची धक्कादायक घटना खांदा कॉलनीत घडल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पालकांच्या तक्रारी नुसार खांदेश्वर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात अपनयनचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




निर्विघ्न वय १४ वर्ष असे अपहरण झालेल्या तरुणाचे नाव आहे. निर्विघ्न याची शाळेची फी भरली नसल्याने निर्विघ्न आणि त्याची आई तसेच वडील हे तिघे शाळेतील शिक्षकांना भेटण्यासाठी गेले. शिक्षकांची भेट घेऊन निर्विघ्न यांच्या शाळेची फी काही दिवसांतच भरतो अशी विनंती निर्विघ्न यांच्या वडिलांनी केली. शिक्षकांनी ही विनंती मान्य करून निर्विघ्न यांच्या नाम वर्तनाबाबत वडिलाकडे तक्रार केली. निर्विघ्न हा शाळेत खूप मस्ती करतो तसेच वर्गात खूप बडबडतो अशी तक्रार शिक्षकांनी केली.

या तक्रारीनंतर निर्विघ्न यांच्या आई वडिलांनी निर्विघ्न याला खडसावले आणि शाळेतून पुन्हा घरी जाण्यासाठी निघाले, याच वेळी शाळेच्या बाहेर पडल्यानंतर वडील कामावर गेले आणि आई घराकडे निघाली या वेळी निर्विघ्न याने मी इथे थांबतो तुम्ही घरी जावा असे सांगितल्यानंतर निर्विघ्न हा पुन्हा घरी गेलाच नाही, मुलगा घरी आलाच नाही हे पाहून, आई-वडीलाने त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली, मात्र मुलगा निर्विघ्न सापडला नाही. त्यामुळे अपनयनचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पनवेल आरटीओमध्ये दुचाकीसाठी नवीन मालिका

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये नवीन खाजगी दुचाकी वाहनांसाठी एमएच-४६ सीएस या नवीन मालिका लवकरच सुरु होत असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल यांनी कळविले आहे. या मालिकेतील आकर्षक, अनाकर्षक नोंदणी क्रमांक राखीव करायचे असल्यास नागरिकांनी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत पनवेलच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयात संपर्क साधावा.

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५७अ नुसार विहित केलेले आकर्षक नोंदणी क्रमांक व त्यासाठीचे शुल्क याबाबतची सविस्तर माहिती, पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयचे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे. एकाच नोंदणी क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्जदारांनी अर्ज केल्यास उक्त नमूद तरतूदीनुसार नोंदणी क्रमांकासाठी जाहीर लिलाव केला जाईल, याची नोंद घेण्यात यावी. असे पनवेलचे प्रादेशिक परिवहन अधिकारी, यांनी पनवेल कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील उरण, पनवेल, कर्जत व खालापूर तालुक्यातील नागरिकांना एका प्रसिध्दी पत्रकान्वये आवाहन केले आहे.

## जागतिक वसुंधरा दिनानिमित्ताने पनवेल मनपातर्फे युवा हवामान परिषद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक वसुंधरा दिनानिमित्ताने पनवेल महानगरपालिका व पिल्लई कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच युवा हवामान परिषद २०२४चे आयोजन करण्यात आले.

प्रभारी आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ व उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमास महापालिकेचे उद्यान विभागाचे पर्यवेक्षक सिध्दार्थ कांबळे, पिल्लईच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजानन वडेर, उपप्राचार्य दिपीका शर्मा, कार्यक्रम समन्वयक आरती सुखेजा, कॉमर्स विभाग समन्वयक डॉ.किरण देशमुख आदी उपस्थित होते.

या वेळी हवामान बदल या विषयांतर्गत प्लास्टिक कचरा व्यवस्थापन धोरण निर्मितीमध्ये तरुणांचा सहभाग व पर्यावरण संरक्षण या विषयावरती यंग इंटरप्रायझेस आणि फिल गुड इको नेचर संस्थेचे संस्थापक शारंग अंबडकर, सी फोर्टीज सिटी संस्थेचे वरिष्ठ व्यवस्थापक निखिल कुलकर्णी, ब्लागर आणि सामाजिक कार्यकर्ते राज सराफ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी पर्यावरण विषयांवर आधारित विद्यार्थ्यांची प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. विजेत्या विद्यार्थ्यांना पदक देऊन सन्मानित करण्यात आले. या परिषदेस महाविद्यालयातील सुमारे २०० विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ आणि शिक्षक सहभागी झाले होते.



## पनवेल मनपातर्फे मतदान जनजागृतीपर विविध उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४साठी स्वीप कार्यक्रमांतर्गत दिव्यांग व स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांमध्ये मतदान जनजागृती करण्यासाठी महापालिकेच्यावतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनमध्ये नुकतेच एका कार्यक्रमाचे आयोजनकरण्यात आले.

प्रभारी आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ३३ मावळ लोकसभा मतदारसंघामधील १८८ पनवेल विधानसभा मतदार संघांतर्गत घेण्यात आलेल्या या कार्यक्रमास स्वीप पथक प्रमुख शहर अभियंता संजय जगताप, दिव्यांग विभाग प्रमुख प्रकाश गायकवाड, स्वप्नाली चौधरी आदी उपस्थित होते.

याबरोबरच शुक्रवारी (दि. २६) कामोठे येथे बचत गटांसाठी मतदान जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तसेच बचत गटाच्या महिलांनी रॅली काढली. प्रभाग समिती ब हद्दीतील कळंबोली, खांदा कॉलनी, नवीन पनवेल इत्यादी ठिकाणी मतदान जनजागृतीचे बॅनर लावण्यात आले. आशा सेविकांनी सेक्टर ५, कामोठे, साईनगर, दर्गा वाडी, नवीन पनवेल, कळंबोली येथे मतदान जनजागृती केली. तसेच महापालिका अधिकारी व कर्मचारी यांनी भीमनगर झोपडपट्टी येथे मतदान जनजागृती केली.

## महात्मा फुले महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर चर्चासत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये शनिवारी (दि. २७) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रासाठी ठाणे येथील जोशी, बेडेकर कॉलेजच्या प्राचार्या डॉ. सूचित्रा नाईक या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या व कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कोकण विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. विजय नारखेडे हे होते.




सदर चर्चासत्रासाठी रायगड विभागातील विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते चालू शैक्षणिक वर्षा मध्ये महाराष्ट्रातील सर्वच महाविद्यालया मध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होणार असून या नवीन शैक्षणिक धोरणा विषयी अनेकांच्या मनामध्ये आजही विविध प्रकारच्या शंका आहेत. त्याचा अभ्यासक्रम, त्याची रचना, क्रेडिट सिस्टम, विषयांची निवड, वेळापत्रक, शिक्षकांचा कार्यभार आदि प्रश्नांवर सांगो पांग चर्चा करण्यात आली.

चर्चासत्र हे दोन सत्रामध्ये घेण्यात आले. या चर्चासत्रात प्राचार्या डॉ. सूचित्रा नाईक यांनी आपल्या व्याख्यानाच्या सुरुवातीस महाराष्ट्रातील शैक्षणिक परंपरा विषद करताना सांगितले की महाराष्ट्राला फार मोठी शैक्षणिक परंपरा असून महाराष्ट्र हा बालशिक्षणापासून ते उच्चशिक्षणापर्यंत अग्रेसर राज्य म्हणून गणला गेला आहे शिक्षणामध्ये नाविन्यता आणण्यामध्ये महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर राहिला आहे. त्याचप्रमाणे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असून महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठांमध्ये या धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांमध्ये कौशल्य शिक्षणावर भर देण्यात आला असून हे धोरण राबविण्यासाठी शिक्षकांनी सतर्क राहून त्यांना आपले ज्ञान अद्ययावत ठेवावे लागणार आहे तसेच त्यांना केवळ आपल्याच विषयाचे ज्ञान असून चालणार नाहीतर त्यांना देखील अद्ययावत तंत्रज्ञान, कम्युनिकेशन कौशल्य आदि विषयाचे ज्ञान असणे अत्यंत महत्वाचे आहे. त्याच बरोबर नवीन शैक्षणिक धोणामध्ये लवचिकता आणण्यात आली असल्याने विद्यार्थ्यांना विषय व शाखा निवडीचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या आवडी नुसार व क्षमतेनुसार स्वतःला सिद्ध करता येईल. असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. नाईक यांनी केले व उपस्थित प्राचार्य व प्राध्यापकांशी संवाद साधत त्यांच्या शंकांचे निरसन केले कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी केले व कार्यक्रमाच्या शेवटी प्रा.सोपान गोवे यांनी उपस्थितांचे आभार मानले तर डॉ. लीना मेश्राम व प्रा. प्रवीण गायकर यांनी सूत्रसंचालन केले.

## उरणमध्ये वन्यजीवांसाठी पाणवठे

**उरण :** उष्णतेची लाट सुरू असून माणसाला या उष्म्याच्या झळा सोसाव्या लागत असतांना वन्यजीवांची काळजी करीत चिरनेरमधील जंगलात कोरड्या पडलेल्या पानवठ्यात ड्रमने पाणी वाहून नेत हे पाणवठे भरले जात आहेत.

उरणच्या निसर्गप्रेमी आणि पर्यावरणवादीच्या उपक्रमाचे कौतुक केले जात आहे. सध्या पारा ४० अंश पार जाऊ लागला आहे. त्यामुळे घरातून कामाशिवाय बाहेर पडू नका,



उष्णतेपासून संरक्षण करा, उन्हाळ्यात सुरक्षा म्हणून साहित्य वापरा आदी सूचना केल्या जात आहेत, मात्र माणसा प्रमाणेच या निसर्गाचा भाग असलेल्या वन्यजीवांच्या जीवलाही या वाढत्या उष्णतेची झळ पोहचत आहे.

जंगलातील नैसर्गिक पाण्याचे स्रोत कमी झाले आहेत किंवा नष्ट केले आहेत. त्यामुळे वन्यजीवाची होणारी काहिली थांबविण्यासाठी चिरनेरच्या फ्रेंड्स ऑफ नेचर या संस्थेचे संस्थापक जयवंत ठाकूर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळून ड्रमच्या सहाय्याने दुरून पाणी वाहून आणीत कोरडे झालेले पाणवठे पुन्हा भरण्याचे काम सुरू केले आहे.

# सरफरोश @ २५

## मैं अपने मुल्क को अपना घर समजता हू...


नव्वदच्या दशकात शेजारी राष्ट्रांतून काही गझल गायक भारतात आपल्या गझल गायकीच्या कार्यक्रमासाठी/ मैफिलीसाठी येत आणि मुंबई, दिल्ली, जयपूर, हैदराबाद इत्यादी अनेक शहरांत त्यांचे कार्यक्रम होत. नवश्रीमंत व उच्चभ्रू वर्ग त्यांचा मोठाच श्रोता. त्यांच्या गझल गायकीने अनेक संगीत शौकीन मंत्रमुग्ध होत. गुलफाम हसन (नसिरुद्दीन शहा)देखील असाच गझल गायक पाकिस्तानातून भारतात येऊन लोकप्रिय झालेला, पण त्याचा तो 'मुखवटा' असतो. त्याचा खरा चेहरा वेगळाच असतो. त्याने येथे राजस्थानच्या सीमाभागातून पाकिस्तानच्या शस्त्रास्त्रांना भारतात आणण्याचा डाव सुरू ठेवलेला असतो. त्यात उंटाचा अतिशय चलाखीने वापर करण्यात येत असतो. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजयसिंग राठोड (आमिर खान) हे सगळे हुशारीने विणलेले जाळे, चलाख गुन्हेगारी कशा पध्दतीने उध्वस्त करतो याची उत्तरोत्तर रंगत जाणारी क्लासिक कलाकृती म्हणजे, जॉन मॅथ्यूज मथान दिग्दर्शित सरफरोश. (मुंबईत रिलीज ३० एप्रिल १९९९)च्या प्रदर्शनास खणखणीत पंचवीस वर्ष पूर्ण होत आहेत. देशभक्तीवरील एक वेगळा चित्रपट म्हणूनही हा चित्रपट ओळखला जातो. आजही हा चित्रपट तेवढाच प्रभावी वाटतो. आपल्याला गुंतवून ठेवतो. कितीही वेळा हा चित्रपट पाहिला तरी तोच प्रभाव. याचे कारण, त्याची वेगळी थीम आणि सतत टर्न आणि ट्विस्ट असलेली पटकथा व त्याची मांडणी. चित्रपटाची सुरुवात अजय आणि सीमा (सोनाली बेन्द्रे) यांच्या नवी दिल्लीतील कॉलेजमधील प्रेमाच्या गोड गोड गोष्टीने होते. त्यात प्रेमगीतांचा गोडवा, शिडकावा मिळतो. आणि एकदा अचानक अजय हा पोलीस असल्याचे समजताच सीमाला पडद्यावर आणि आपल्याला बसल्या जागी धक्का बसतो. चित्रपट येथून जे वळण घेतो ते अनेक गोष्टींसह रोमांचकता, उत्सुकता वाढत वाढत नेतो...

### झूम प्रहर




**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

दिग्दर्शक जॉन मॅथ्यूज मथानचा हा पहिलाच चित्रपट आणि त्याने प्रस्थापितांना चांगलाच धक्का दिला. त्याची गरज असतेच. अशा कसदार कलाकृतीमागे अतिशय छोट्या छोट्या गोष्टींसह बरीच मेहनत असते. जॉन मॅथ्यूज मथानचे प्रगती पुस्तक कौतुकास्पद आहे. रिचर्ड टनबरो दिग्दर्शित 'गांधी' (१९८३)च्या वेळेस जॉन सेकंड युनिट सहाय्यक दिग्दर्शक होता. मग आक्रोशच्या वेळेस दिग्दर्शक गोविंद निहलानी यांचा सहाय्यक दिग्दर्शक होता. त्यानंतर त्याने जाहिरातपटांवर लक्ष केंद्रित केले. अवघ्या काही सेकंदात एकाद्या उत्पादनाची अतिशय प्रभावी जाहिरात करणे यात बरीच कल्पकता, कसब व कौशल्य असते. अशातच १९९२-९३ साली मुंबईत जातीय दंगल आणि मग बॉम्बस्फोट झाले. सर्वांसाठीच हा चिंतेचा विषय होता. त्याच सुमारास जॉन मॅथ्यूज जाहिरातपटाच्या कामानिमित्त दिल्लीत गेला असता संध्याकाळी खूपच लवकर होत असलेल्या शांततेने, त्यातील अनामिक तणावाने तो अंतर्मुख झाला. या सगळ्यातून त्याला कथाआशय सुचत गेला. तो डेव्हलप करायला वेळ गेला. त्या काळात जॉन मॅथ्यूज गाडीने रस्ता मार्गाने उत्तर भारतात भरपूर फिरला. त्यातून अनेक संदर्भ सापडत गेले. जॉन वास्तववादी चित्रपटाचा विलक्षण चाहता. मनोरंजनाची चौकट सांभाळून आपणही वास्तवाच्या जवळ जाणारा चित्रपट निर्माण करावा हे त्याने पक्के ठरवले होते. १९९५ साली त्याने आमिर खान बराच बिझी असताना त्याची अर्ध्या तासाची भेट मागितली. आमिरची त्या काळात रोमॅन्टीक हीरो अशी इमेज होती. त्याला 'सरफरोश' एक नवीन रुपाची संधी होती. गोष्ट ऐकताना आमिरने जॉन मॅथ्यूजला तीन तास दिले. सोनाली बेन्द्रेने जॉन मॅथ्यूजच्या अनेक जाहिरातीसाठी मॉडेलिंग केले असल्याने तिची






निवड पक्की होती. जॉन मॅथ्यूजनेच तिचं प्रवीण निश्चलला 'इंग्लिश बाबू देशी मेम साठी नाव सुचवले आणि ती मॉडेलिंगकडून चित्रपटात आली. शाहरुख खान त्यात तिचा नायक होता. तो चित्रपट सेटवर जाईपर्यंत सोनालीने भरत रंगाचारी दिग्दर्शित 'टक्कर ' (सुनील शेट्टी व नसिरुद्दीन शहासोबत) आणि के. रवि शंकर दिग्दर्शित 'आग' (गोविंदासोबत) साईन केले. चित्रपट निर्मितीत 'पडद्यामागे' अशा अनेक गोष्टी घडत बिघडत असतात. त्या खूप रंजक असतात. प्रश्न होता, आमिरपेक्षा सोनाली उंच तर ठरणार नाही? ते तर उघडपणे दिसतेय. पडद्यावरही तसेच दिसून कसे चालेल? पब्लिकचे फार लक्ष असते. 'सरफरोश' रिलीज झाल्यावर सोनालीच्या मुलाखतीचा मला योग आला असता तिने सांगितलं, ते सर्वांच्याच लक्षात आले. म्हणून एकदा जॉनच्या घरच्या पार्टीत आम्हा दोघांना जवळ उभे करून कसे दिसतेय, उंचीत फरक आहे का हे अजमावून पाहिले असता, तसा काही विशेष फरक जाणवत नव्हता आणि मग चित्रपट पाहतानाही तसा उंचीतील फरक वगैरे दिसत नाही.

जॉन मॅथ्यूजने व्यक्तीरेखेनुसार एकेक कलाकार निवडायला सुरुवात केली. नसिरुद्दीन शहाला पोलीस इन्स्पेक्टर सलीमच्या भूमिकेसाठी विचारले असता त्याने म्हटले, नको. कारण आपण अशी भूमिका साकारलीय. काही वेगळे असेल तर सांग. गुलफाम हसनची भूमिका मग त्याला मिळाली. ती त्याने उत्तम वठवलीय. बराच काळ त्याचा संशय येत नाही हेच तर विशेष. इन्स्पेक्टर सलीमसाठी आमिरनेच मुकेश ऋषिचे नाव सुचवले. आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित बाझी मध्ये या दोघांनी एकत्र काम केले होते. वल्लभ व्यास (मेजर अस्लम बेग), अखिलेन्द्र मिश्रा (मिर्ची सेठ), मकरंद देशपांडे (शिवा), मनोज जोशी (एस. पी. बैजू), प्रदीप रावत (सुल्तान), राजेश जोशी (बाला ठाकूर), स्मिता जयकर (अजयची आई), आकाश खुराना (अजयचे वडील) तसेच नवाऊद्दीन सिद्दीकी (तोपर्यंत त्याला ओळख मिळाली नव्हती), सुरेखा सिकरी, सुकन्या मोने, जयवंत वाडकर, अशोक लोखंडे, सुनील शेंडे, हिमायत अली, डिंपल इनामदार इत्यादींच्या भूमिका आहेत. गोविंद नामदेव यांनी साकारलेली वीरन ही व्यक्तीरेखा वीरप्पनची आठवण करून देणारी होती.

चित्रपटाने निर्मितीवस्थेत बराच काळ घेतला पण कलाकृती अतिशय स्फोटक आणि प्रभावी अशी पडद्यावर आली. तेच तर महत्वाचे असते. चित्रपटाच्या पूर्वप्रसिध्दीवरून त्यात काय आहे अथवा असावे याचे आकलन होत नव्हते. तोपर्यंत आगामी चित्रपटाबाबत अवाजवी मिडिया हाईप दिला जात नसे. चित्रपटाबद्दल उत्सुकता निर्माण होईल असे वातावरण तयार होई आणि त्यात लोकप्रिय गीत संगीताची साथ मिळत असे. (त्या काळात रामगोपाल वर्मा दिग्दर्शित 'सत्या', शेखर कपूर दिग्दर्शित 'बॅण्डिक्ट क्वीन' या चित्रपटांबाबत अगदी असेच घडले. चित्रपट जास्त सांगेल वा बोलेल यावर भिस्त होती. आता नवीन चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच त्याबद्दल इतकं नि असे सांगितले जाते की त्या चित्रपटाचे तिकीट काढून थिएटरमध्ये जाण्याची गरजच राहत नाही.) सेन्सॉरने चित्रपटातील पाकिस्तान, आयएसआय या उल्लेखांना हरकत घेतली होती, पण ते कापले तर चित्रपटाचा मूळ हेतू बोथट होईल असे जॉन मॅथ्यूजने पटवून दिले. येथे दिग्दर्शक दिसतो.

चित्रपट प्रदर्शनास सज्ज होत असतानाच त्याच्या गाण्याची ध्वनिफीत रसिकांसमोर आली तीच गाणी लोकप्रिय झाली. विशेषत: होशवालो को क्या खबर ही नीदा फाजलीची जगजितसिंग यांनी गायलेली गझल अप्रतिम. संगीत जतिन ललितचे. या चित्रपटातील इस दीवाने लडके को (पार्श्वगायक अमितकुमार व अलका याज्ञिक), जो हाल दिलका (कुमार शानू व अलका याज्ञिक), ये जवानी हद कर दे कविता कृष्णमूर्ती) ही गाणी समीरने लिहिली होती. जिंदगी मौत ना बन जाऐ हे इसरार अंसानी लिखित गाणे सोनू निगम व रुपकुमार राठोड यांनी गायले. या गाण्याने चित्रपटाचा देशभक्तीचा परिणाम आणखीन गडद होतो.

प्रभावी व बोलके संवाद हेदेखील या चित्रपटाचे वैशिष्ट्य. मै अपने मुल्क को अपना घर समजता हू, क्या ठाकूर तेरे को कितनी बार बुलाया तू आता नही इत्यादी, पण सर्वाधिक महत्वाचा ठरला इन्स्पेक्टर सलीमचा संवाद, फिर कभी किसी सलीम को मत कहना...यह मुल्क उसका नहीं...मुकेश ऋषि या एका संवादाने जास्त फोकसमध्ये आला (प्रियदर्शन दिग्दर्शित 'गर्दीश', आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'बाझी' आणि हा 'सरफरोश' हे त्याला चित्रपटसृष्टीत स्थिरावण्यातील महत्वाचे टप्पे) खरं तर या भूमिकेसाठी अमरीश पुरी अथवा नाना पाटेकर यांची निवड होऊ शकली असती असे त्याला वाटले, पण आपली झाली म्हणजेच ही भूमिका अधिकच वेधक करण्यातील आपली जबाबदारी वाढली. या भूमिकेचा अनुभव त्याला बरेच काही देणारा ठरला. सिनेमा हिट झाल्यावर हिंदीत बऱ्याच ऑफर येतील असे अजिबात झाले नाही. दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपटांच्या मात्र ऑफर आल्या.

चित्रपट असा व इतका हिट होईल याची जॉन मॅथ्यूज मथानला खात्री नव्हतीच. चित्रपटाचे कौतुक होईल, बर्यापैकी यश प्राप्त होईल असे वाटले होते. पब्लिकचा रिस्पॉन्स पाहण्यास तो दक्षिण मध्य मुंबईतील मराठा मंदिर चित्रपटगृहात गेला असता तो विलक्षण सुखावला. हाऊसफुल्ल गर्दी चित्रपटात गुंतली होती. टाळ्या आणि शिट्यांनी प्रतिसाद देत होती. आणि अशातच कारगिल युद्धाने वातावरण बदलून गेले. 'सरफरोश'मधील अनेक गोष्टी त्याच युद्धात जाणीव करुन देत होत्या.

हे युद्ध आपण जिंकले, तसेच हा चित्रपटही रसिकांनी आपलासा केला. देशभक्तीवरील चित्रपटात पूर्वीचा मसालेदार मनोरंजनाचा फंडा यात नव्हता. एव्हाना दिग्दर्शक व रसिकांचीही नवीन पिढी आली होती. ती अधिक चौकस होती. त्यांना असेच काही वेगळे हवे होते. 'सरफरोश' म्हणूनच ग्रेट कलाकृती ठरली. याच चित्रपटापासून आमिर खानने चित्रपट निवडीत चोखंदळपणा आणि संख्येत नेमकेपणा आणला. सोनाली बेन्द्रेसाठी हे यश महत्वाचे ठरले. तिने ग्लॅमरस भूमिकाच साकारलीय पण चित्रपट वेगळा होता हे जास्त महत्वाचे.


'सरफरोश'ची प्रसार माध्यमातून आणि चित्रपट रसिकांत भरपूर चर्चा झाली ते यश वेगळेच. या चित्रपटाची एक वेगळीच आठवण. मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांसाठी महालक्ष्मीच्या फेमस स्टुडिओतील मिनी थिएटरमधील शोच्या वेळेस तासाभरातच अचानक वेगळ्याच घटना दिसू लागल्या... थोड्याच वेळात लक्षात आले की, मध्यंतरनंतरचे रिळमध्येच लागलयं... चूक दुरुस्त करून मग सिनेमा पुढे गेला. एक आठवण अशीही.

# लोकशाही जपण्यासाठी मतदान केलेच पाहिजे!

भारताच्या स्वातंत्र्यानंतर सर्व भारतीय महिला आणि पुरुष दोघांना एकाचवेळी मतदानाचा हक्क मिळाला. भारतीय लोकशाहीतील ही गोष्ट युरोपियन आणि अमेरिकन देशांपेक्षा अधिक प्रगल्भ मानली गेली. कारण युरोपियन-अमेरिकन देशात महिला, कामगार, स्थलांतरितांना मतदानाचा हक्क मिळवण्यासाठी अनेक वर्षे संघर्ष करावा लागला होता. अमेरिकेतील महिलांना मतदानाचा अधिकार मिळण्यासाठी १४४ वर्षे लागली. ब्रिटनमधल्या महिलांना हा हक्क मिळायला १०० वर्षे वाट पाहावी लागली. स्विर्त्झलँड मधील महिलांना मत देण्याचा अधिकार १९७४ साली मिळाला. याउलट भारतीय महिलांना त्यादिवशीच मतदानाचा अधिकार मिळाला.

भारताने राज्यघटना स्वीकारल्यापासून देशातील २१ वर्षांवरील प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाचा हक्क मिळाला होता. लोकशाही नागरिकत्वाच्या सर्वात मूलभूत घटकांपैकी एक म्हणून मतदानाच्या अधिकाराचा विचार केला जातो. लोकशाही उत्क्रांतीच्या काळात जगभरात राजकीय अभिजात वर्गाने मतदानाचा अधिकार अनेकदा रोखून धरला होता. स्त्रिया, वांशिक अल्पसंख्यांक आणि गरीब लोकांना नियमितपणे मतदान नाकारले गेले, कारण या वर्गातील लोकांना मतदानाचा अर्थ कळणार नाही आणि त्यांना मतदानाच्या शक्तीचा वापरही करता येणार नाही अशी धारणा होती. भारताने मात्र खूप वेगळा मार्ग निवडला. संविधानाच्या चौकटीत सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वाची सुरुवात झाली. भारतीय राजवटीत प्रत्येक प्रौढ व्यक्तीला मतदानाचा अधिकार देण्यात आला होता. दारीद्र्य आणि निरक्षरतेच्या पातळीने ग्रासलेल्या, जात, वर्ग आणि लिंग भेद-भावांनी त्रस्त झालेल्या देशात, हा खरोखरच एक क्रांतीकारक बदल होता.

सुकुमार सेन हे भारताचे पहिले निवडणूक आयुक्त होते. त्यांनी १९२१ मध्ये भारतीय नागरी सेवेत प्रवेश केला. भारताचे पहिले निवडणूक आयुक्त होण्याआधी ते जिल्हाधिकारी होते. १९५२ च्या सुरुवातीला देशात सार्वत्रिक निवडणुका घेण्याचा निर्णय झाला. पहिली सार्वत्रिक निवडणूक घेण्यासाठी देशासमोर भौगोलिक आणि सामाजिक अशी दोन प्रमुख आव्हाने होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील महिलांना मतदानाचा अधिकार देण्याच्या मुद्द्यावर अधिक जोर दिला. भारत स्वतंत्र झाला तेव्हा आपल्या समाजात महिलांवर अनेक बंधने होती. उत्तर भारतात विशेषत: राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश या ठिकाणी महिलांना अनोळखी लोकांशी बोलायला मनाई होती. याशिवाय गावात महिलांची ओळख त्यांच्या घरातील पुरुषांच्या नावावरून करून दिली जात होती. मतदारयाद्या तयार करतानाच निवडणूक आयोगाच्या लक्षात आले की काही राज्यांमध्ये मोठ्या संख्येने महिला मतदारांची नोंदणी त्यांच्या स्वत:च्या नावाने नाही, तर त्यांच्या पुरुष नातेसंबंधाच्या वर्णनावरून झाली आहे. निवडणूक आयोगाचे कर्मचारी जेव्हा घरोघरी जाऊन नोंदणी करू लागले तेव्हा अनोळखी व्यक्तींसमोर या महिलांनी त्यांची योग्य नावे उघड करण्यास चक्क नकार दिला होता. ही बाब सुकुमार सेन यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी पहिली लोकसभा निवडणूक होण्याआधी पुन्हा एकदा मतदार यादी तयार करण्याचे आदेश दिले. नावासह पुरेसा तपशील दिल्याशिवाय कोणत्याही मतदाराची नोंदणी केली जाऊ नये, अशी सक्त नोटीस सुकुमार सेन यांनी दिली होती. अधिकाधिक महिलांनी मतदान करावे यासाठी मतदार नोंदणीसाठी मुदतवाढ देण्यात आली. मोठ्या प्रमाणात अभियान राबवण्यात आले. राजस्थान आणि बिहारमध्ये मतदार यादीतील महिलांची नावे दुरुस्त करण्यासाठी एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली. एवढं सगळं करूनही लोकांकडून अत्यंत कमी प्रतिसाद मिळाला. शेवटी आठ कोटी महिला मतदारांपैकी २८ लाख महिलांनी आपले खरे नाव देण्यास नकार दिला. त्यामुळे शेवटी मतदार यादीत त्यांची नावे नाईलाजाने काढून टाकण्यात आली.



मतदानाचा अधिकार हा भारतासारख्या लोकशाही देशाचा महत्त्वाचा भाग आहे. आपल्या देशात अनेकजण मत देण्यास पात्र आहेत, तर काही लोक त्याबद्दल उत्साही आहेत. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत ६७.११% मतदान झाले होते जे भारताच्या इतिहासातील सर्वात जास्त मतदान होते. देशाची राज्यघटना तयार करतेवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित जवाहरलाल नेहरू हे भारतातल्या सरसकट सर्व नागरिकांना मतदानाचा हक्क द्यावा याबाबत आग्रही होते, परंतु काही नेत्यांनी मात्र मर्यादित लोकांनाच हा अधिकार असावा असे मत मांडले. यावर बरेच वाद झाले. सरसकट सर्वांना मतदानाचा अधिकार दिल्याने त्याचे दूष्परिणाम होतील. असे काही नेत्यांच्या मत होते. या लोकांचे म्हणणे ऐकून भारतातला मतदानाचा अधिकार सुशिक्षित लोकांपुरताच मर्यादित केला गेला असता तर फार विचित्र स्थिती निर्माण झाली असती. केवळ सुशिक्षितांनाच मतदानाचा अधिकार असेल असा निर्णय घेतला गेला असता तर देशातली मतदानाची टक्केवारी ३० किंवा ४० टक्केच राहिली असती, परंतु आजची परिस्थिती अशी आहे की, फक्त ज्यांना मतदानाचा अधिकार असावा असा आग्रह धरला जात होता तेच सुशिक्षीत आणि उच्चभ्रू लोक मतदानाच्या दिवशी जाहिर केलेल्या सुट्टीत बाहेर फिरायला जातात, मतदानाच्या दिवसाची सुट्टी मतदानाचा हक्क बजावण्याऐवजी मजा मस्ती करण्यात घालवतात. जे लोक मतदान करण्याच्या लायक नाही असा समज होता तेच गरीब, अशिक्षित लोक मात्र उत्साहाने रांगा लावून मतदान करताना दिसतात. अशी ही विपरीत स्थिती आहे. आपले मत कोणालाही असो किंवा आपल्या मतदारसंघात उभ्या असलेल्या एकालाही नसो पण आपण कर्तव्य म्हणून मतदान केले पाहिजे कारण ते आपले कर्तव्य आहे. ते कर्तव्य लोकशाहीप्रती, देशाप्रती किंवा कोणत्या पक्षाप्रती नसते तर ते आपल्याप्रती असते, आपल्या हितासाठी असते. ही जाणीव ठेवून आवर्जून मतदान केले पाहिजे. आपले पुढील पाच वर्षांचे आयुष्य कसे असावे हे आपले मतदान ठरवत असते कारण आपल्या देशाचा कारभार पाहणारे कारभारी आपण मतदानातून निवडत असतो. मतदानाच्या अधिकाराचा अर्थ नीट समजून घेण्याची गरज आहे. भारताची लोकशाही ही लोकांनी चालवलेली राज्यपद्धती आहे. देशातला प्रत्येक नागरीक लोकसभेत जाऊन राजकीय कारभारावर चर्चा करणे शक्य नाही त्यासाठी त्याने आपले प्रतिनिधी लोकसभेत पाठवून त्यांच्या माध्यमातून आपल्या अडीअडचणी मांडाव्या, देशाचे राजाकारण चालवावे ही अपेक्षा असते. हे प्रतिनिधी जनतेप्रती आणि देशाप्रती इमानदार आणि प्रामाणिक असतील तरच देशाचा कारभार लोकांच्या हिताचा होईल, मात्र याबाबतीत प्रत्येक नागरिकाने मतदान करून आपले मत व्यक्त केले पाहिजे. जे लोक मतदान करणार नाहीत ते देशाच्या कारभाराच्या बाबतीत उदासीन आहेत असे म्हणावे लागेल. ही उदासीनता झटकून प्रत्येकाने आवर्जून मतदान केले पाहिजे.

आपले एक मत खूप महत्वाचे आहे कारण ते ठरवते की भविष्यात आपल्या देशाचे नेतृत्व कोण करेल. मतदानाचे महत्त्व प्रत्येकाने समजून घेणे गरजेचे आहे. दुर्दैवाने ३० टक्क्यांपेक्षा जास्त लोक मतदानाच्या दिवशी मतदान करत नाहीत. या लोकसभा निवडणुकीत आपली लोकशाही मजबूत राहावी यासाठी योग्य उमेदवार निवडण्याची ताकद तुमच्याकडे आहे. आपली लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी मतदान महत्त्वाचे आहे. जेव्हा माझ्या मताने फरक पडत नाही हा विचार आपल्या मनात येतो तेव्हा आपण खऱ्या अर्थाने लोकशाहीचे नुकसान करत आहोत हे आपण विसरता कामा नये. शासनाने मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले आहे. आपल्या एका मतामध्ये महत्त्वपूर्ण फरक पडण्याची क्षमता आहे. जर आपले मतदान आपण योग्य प्रतिनिधींना केले नाही तर तोच पक्ष आणखी पाच वर्षे सत्तेत राहील. जर देशतील शासन हे योग्य पद्धतीने चालत नसेल तर त्याला आपण जबाबदार आहोत कारण आपण त्यांना निवडून देताना योग्य ती भूमिका घेतलेली नसते. मतदान करतांना उमेदवारांबाबत असमाधानी असाल तर NOTA या पर्यायाचा अवलंब करून आपण आपली ना पसंती दर्शवू शकता. नोटा याचा अर्थ वरीलपैकी कोणीही नाही, लोकशाही भक्कम करण्याच्या दृष्टीने आणि देशाला सर्वार्थाने सक्षम करण्यासाठी आपण निश्चितपणे मतदानाचा हक्क बजावलाच पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्यघटनेनं आपल्या सर्वांना मतदानाचा मूलभूत अधिकार दिला आहे. जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधी देशाचे व राज्याचे राजकारण बनवतात. त्यामुळे मतदानाचा अधिकार हा अतिशय महत्त्वाचा आहे. राज्यघटनेनं दिलेल्या इतक्या महत्वपूर्ण अधिकाराची पायमल्ली होऊ देऊ नका म्हणून सर्वांनी मतदानाचा अधिकार बजावावा.

**-प्रवीण डोंगरदिवे,**
**उपसंपादक**
**विभागीय माहिती कार्यालय**
**कोकण विभाग, नवी मुंबई**

# साहित्यातील दीपस्तंभ मधु मंगेश कर्णिक

रत्नागिरी जिल्ह्यात सन १९९०मध्ये ६४वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले होते. या संमेलनाचे अध्यक्ष, कोकणचे सुपुत्र आणि ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक हे होते. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष अनेक झाले, प्रत्येकांनी आपापल्या परीने साहित्य क्षेत्रात बदल करण्याचा प्रयत्न केला, मात्र खऱ्या अर्थाने साहित्य प्रचार आणि प्रसार व्हावा म्हणून पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांनी ज्या तळमळीने कार्य केले ते अद्वितीय ठरते. कारण त्यांना मिळालेल्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात त्यांनी खऱ्या अर्थाने मराठी भाषा, मराठी साहित्य आणि साहित्य चळवळ वृंद्धीगत करण्यासाठी कृतीयुक्त प्रयत्न केला. साहित्य क्षेत्रांत सुरू असलेल्या परंपरा सोबत घेत नवी दिशा साहित्य क्षेत्राला दिली. म्हणूनच ते साहित्य क्षेत्रातील एक दीपस्तंभ म्हणावे लागेल.



मुळात त्यांची आणि माझी पहिली ओळख ही मालगुंड येथे कोकण मराठी साहित्य परिषदेच्या केंद्रीय साहित्य संमेलनात झाली. त्यावेळी त्या संमेलनाचा मी कार्याध्यक्ष होतो. तेंव्हापासून आदरणीय भाईंनी माझ्या पाठीवर सदैव नव्या ऊर्जेचा आणि आशीर्वादाचा हात कायम ठेवला. त्यावेळेपासून ते आजपर्यंत आदरणीय मधुभाईंची प्रत्येक भेट ही नविन विचार शिकवणारी असते. आज वयाची नव्वदी पार केल्यानंतरही त्यांचा उत्साह आमच्यासाठी प्रेरणादायी ठरतो. अत्यंत साधी राहणी, समाजोपयोगी असणारी मौलिक विचारसरणी, आकाशाला भिडणारी वैचारिकदृष्टी असतानाही कधीही मातीची जोडलेली नाळ तुटू न देता आदर्शवत जीवनशैली निर्माण करणारे मधुभाई मनाचा ठाव घेतात.

अशा या नवविचारांनी युक्त असलेल्या आदरणीय मधुभाई यांचा जन्म २८ एप्रिल १९३१ रोजी करुळ ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग येथे झाला. लहानपणापासूनच गरीबीचे चटके सहन करत ते मोठे झाले. शिक्षण घेताना अनेक अडचणी आल्या.मात्र त्या दूर करत शिक्षण पूर्ण केले. ते शालेय शिक्षण घेत असताना, त्यांच्या शाळेत एकदा साने गुरुजी यांचे कथाकथन झाले. त्यानंतर साने गुरुजींनी विद्यार्थ्यांशी गप्पा मारताना सर्व विद्यार्थ्यांना विचारले की, तुम्ही मोठेपणी काय - काय होणार? अनेकांनी अनेक उत्तरे दिली; मात्र आदरणीय मधुभाई यांनी मात्र मी मोठेपणी साहित्यिक होणार असे सांगितले. मराठीत म्हण आहे की, बाळाचे पाय पाळण्यात दिसतात! आदरणीय मधुभाई यांचे हे उत्तर याचीच प्रचिती देते. तेंव्हापासून समाजातील नकारात्मकतेला दूर सारत सकारात्मकता स्वीकारणाऱ्या लेखणीतून सुरू झालेला, त्यांचा नैराश्यावर मात करणारा हा प्रवास मोठा आशावाद निर्माण करत, आज त्यांच्याच कर्तृत्वाच्या जोरावर त्यांनी गगनाला नेउन भिडवला आहे.

अशा प्रकारे अत्यंत नि:स्वार्थी भावनेने प्रेरीत होऊन कार्य करत दीपस्तंभ बनलेले आहेत. आज आदरणीय मधुभाई यांचा वाढदिवस. त्यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! आदरणीय भाईंनी शतायुषी व्हावे हीच गणपतीच्या चरणी प्रार्थना! नव्वदी पार केल्यानंतरही अत्यंत उत्साहाने कोकण मराठी साहित्य परिषद आणि साहित्य क्षेत्रात आदरणीय मधुभाई वावरत असतात. भविष्यात आदरणीय मधुभाईना उत्तम आरोग्य आणि समाधान लाभावे हीच प्रार्थना..

**-गजानन कमलाकर तथा आबा पाटील,**
**अध्यक्ष, कवी केशवसुत स्मारक व्यवस्थापन समिती, मालगुंड**

# पालीत संकष्ट चतुर्थीला फुलला भक्तिमळा

## बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांच्या लागल्या रांगा

**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील अष्टविनायकांपैकी एक तीर्थक्षेत्र असलेल्या पालीतील मंदिरात संकष्ट चतुर्थीला शनिवारी (दि.२७) भाविकांनी मोठी गर्दी केली होती. शनिवार, रविवार सुट्टी असल्याने भाविक पर्यटन व दर्शनाला बाहेर पडल्याने गर्दी झाली होती. पहाटेपासून बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांनी रांगा लावल्या होत्या.

सुट्टीत पर्यटनासाठी आलेल्या तसेच कोकणातून पुणे, मुंबई व ठाण्याकडे परतणाऱ्या चाकरमान्यांनी आवर्जून बल्लाळेश्वराचे दर्शन घेतले. भाविकांची मोठी गर्दी असल्याने येथील दुकानदार व हॉटेल व्यावसायिकांचा धंदादेखील तेजीत होता. परिसरातील दुकाने, हॉटेल व लॉज ग्राहकांनी गजबजले होते. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.

पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली चोख सुरक्षा व व्यवस्था करण्यात आली होती. बल्लाळेश्वर देवस्थानचे सुरक्षारक्षकदेखील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी तैनात आहेत.



**देवस्थान ट्रस्टने भाविकांसाठी सोयीसुविधा उपलब्ध केल्या आहेत. देवस्थानचे दोन भक्तनिवास नाममात्र दरात भाविकांसाठी उपलब्ध केले आहेत. बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी शुद्ध थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. रांगेत उभे राहण्यासाठी रेलींग, मांडव व शेड उभारण्यात आली आहे. वाहने पार्क करण्यासाठी देवस्थानची दोन भव्य मोफत पार्किंग देखील आहे.**

**–जितेंद्र गद्रे, अध्यक्ष, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली**

# पोलादपुरात गावे, वाड्यांमध्ये पाणीटंचाई

## टँकरची संख्या वाढवण्याची गरज

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पंचायत समिती आणि तहसील कार्यालय या दुहेरी यंत्रणांद्वारे पाणीटंचाई निवारण आराखड्यानुसार तालुक्यातील पाणीटंचाईग्रस्त गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे काम सुरू आहे. तालुक्यात प्रस्तावित गावे व वाड्यांच्या तुलनेत प्रत्यक्षात टँकरद्वारे पाणीपुरवठा अत्यल्पच असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पाण्यासाठी ग्रामस्थांना वणवण करावी लागत आहे.

तालुक्यात बैलगाडीद्वारे अथवा टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी ३८ गावे व ७४ वाड्या अशा एकूण ११२ ठिकाणच्या २८ लाख रूपये खर्चाच्या उपायांचा या पाणीटंचाई निवारण कृती आराखड्यामध्ये समावेश करण्यात आला. यामध्ये तुटवली, आंबेमाची, चांभारगणी बुद्रुक, आड, निवे, किनेश्वर गावठाण, तामसडे ही सात गावे आणि



कातळी दत्तवाडी, कामतवाडी, मोरगिरी धनगरवाडी, क्षेत्रपाळ आमलेवाडी, क्षेत्रपाळ धनगरवाडी, तुटवली गळतीचीवाडी, कालवली पवारवाडी, कालवली बौद्धवाडी, कालवली पाटीलवाडी, विठ्ठलवाडी, मोहल्ला, कालवली भोसलेवाडी, किनेश्वरवाडी, किनेश्वर पेढावाडी तसेच मोरेवाडी १५ वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

यापैकी तामसडे हे गाव व मोरेवाडीचा प्रस्ताव शिल्लक असून उर्वरित सहा गावे १४ वाड्यांचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत, मात्र प्रत्यक्षात तुटवली, आंबेमाची ही दोन गावे आणि मोरगिरी धनगरवाडी, कालवली पवारवाडी, कालवली बौद्धवाडी, कालवली पाटीलवाडी, विठ्ठलवाडी, मोहल्ला, कालवली भोसलेवाडी या सात वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

दोन खासगी टँकरद्वारे यंदा पाणीपुरवठा करण्यात येत असून गावे आणि वाड्यांची लोकसंख्या पाहता या दोन्ही टँकरद्वारे सुरू असलेला पाणीपुरवठा अत्यल्प असल्याचे कालवलीतील सहा वाड्यांतील टंचाईग्रस्त ग्रामस्थांचे म्हणणे आहे. याबाबत पंचायत समितीचे शाखा अभियंता कांबळे यांनी पोलादपूर तालुक्यातील दूर्गम डोंगराळ भागातील रस्त्यांवर मोठे टँकर नेताना टँकर पलटण्याची शक्यता असल्याने ही सोय करण्यात आल्याची माहिती दिली आहे.

# हायकल कंपनीचे सामाजिक कार्य कौतुकास्पद –आमदार भरत गोगावले

**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक वसाहतीमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या हायकल कंपनीचे सामाजिक कार्य कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार महाडचे आमदार भरत गोगावले यांनी तालुक्यातील पिंपळकोंड येथे एकात्मिक पाणलोट विकास प्रकल्पाच्या शुभारंभ प्रसंगी व्यक्त केले.



जागतिक जीवन विज्ञान कंपन्यांसाठी प्राधान्य देणारी हायकल कंपनी आणि इंटरनॅशनल असोसिएशन फॉर ह्युमन व्हॅल्यु यांनी जागतिक वसुंधरा दिनानिमित्त पाणीटंचाई दूर करण्याचे पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम घोषित केले होते. पिंपळकोंड येथे एकात्मिक पाणलोट विकास प्रकल्प राबविण्यात येत असून त्याचा शुभारंभ आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते करण्यात आला.

आमदार गोगावले यांनी, ग्रामीण भागातील नागरिकांना स्वच्छ आणि शुद्ध पाणी मिळावे यासाठी पाणलोट विकास प्रकल्प महत्त्वाचा ठरणार असून कंपनीने सुरू केलेल्या उपक्रमाला आपण सर्व प्रकारे सहकार्य करू, अशी ग्वाही दिली.

हायकल कंपनीचे एचआर अध्यक्ष रतिश झा यांनी, पाणलोट प्रकल्पाच्या माध्यमातून या परिसरातील किमान पाच हजार ग्रामस्थांना लाभ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

या प्रकल्पांतर्गत ७५० हेक्टर क्षेत्रातील माती आणि जलसंधारणावर उपाययोजना करण्यात येणार आहेत. पाणलोट क्षेत्रात येणाऱ्या गावातील किमान २०० ग्रामस्थांमध्ये विकास प्रक्रिया आणि पाणलोट व्यवस्थापन तंत्राबाबत जागृती निर्माण करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# रोहा तळाघर ग्रामपंचायतीमध्ये महायुतीचा जोरदार प्रचार

**धाटाव : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी रोहा तालुकाध्यक्ष विनोद पाशिलकर यांच्या नेतृत्वाखाली तळाघर ग्रामपंचायतीमध्ये महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांचा जोरदार प्रचार करण्यात आला. जवळपास ५०० घरांमध्ये महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घड्याळ हे चिन्ह पोहचविले असून मतदारांनी तटकरे यांना प्रचंड मताधिक्य देऊन विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले.

तळाघर व बोरघर गावातून महायुतीच्या उमेदवाराला उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. तालुका युवक अध्यक्ष जयवंत दादा मुंढे, वरसे गणाध्यक्ष दत्ता चव्हाण, माजी सरपंच ज्ञानेश्वर साळुंखे, सरपंच गणेश माने, माजी पं. स. सभापती अनिल भगत, ज्येष्ठ नेते शंकर भगत, तळाघर ग्राम अध्यक्ष हरिश्चंद्र माने, माजी सरपंच मनोज कळंबे, रुपेश शिंदे, भाजपचे मच्छिंद्र मोरे, भाजप धाटाव विभाग अध्यक्ष कृष्णा बामणे, भाजपचे संकेत मोरे, धिरज मोंडे, शिवसेना कृष्णा चव्हाण, युवा नेते मयुर मोंडे, माजी उपसरपंच संतोष माने, महेश भगत यांसह राष्ट्रवादी, शिवसेना, भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# रायगडात पुन्हा उष्णतेच्या झळा

**रायगड** : हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार रायगडात पुन्हा एकदा उष्णतेच्या झळा आणखी तीव्र झाल्या आहेत. यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. नागरिकांना या उष्णतेच्या झळा आणखी चार दिवस सहन कराव्या लागणार असल्याचे सांगण्यात आल्याने सतर्कता बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **रमेश रामा गावंड आणि इतर** यांचेकडून **रामयश कनौजिया आणि इतर** कायमस्वरुपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **रमेश रामा गावंड आणि इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे पिरकोन (५५३३३९)**
**(ULPIN १८८५८४८९८३९), तालुका–उरण, जिल्हा– रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे. आर. चौ.मी.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २१६/२/क | १ | ०.१७.९० पो.ख. ०.०१.८० | २.०६ |
| | | एकूण ०–१९–७० | |
| या एकूण क्षेत्रापैकी विक्रेते यांच्या हिश्श्याचे ०.०९.७० गुंठे | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**दिनांक : २७/एप्रिल/२०२४**

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**
बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड – क्रमांक ३३/३४, सेक्टर २२ कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड– ४१०२०६ मो.क्र. ९९२०४७५८०१


# कर्जतच्या २५ गावे, २८ वाड्यांना टँकरने पाणी



**कर्जत : प्रतिनिधी**

सध्या उन्हाळा महिना कडक सुरू झाला आहे. अंगाची लाहीलाही होत आहे. त्यात अनेक गावात विहिरी, बोअरवेल, नद्या, नाले सगळेच कोरडे पडल्याचे भयानक चित्र दिसून येत आहे. तालुक्यातील ग्रामीण भागात पाणीटंचाईची समस्या भेडसावत आहे. पंचायत समितीच्या माध्यमातून पाणीटंचाई निवारणासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. पाण्याची समस्या गंभीर असलेल्या २५ गावे आणि २८ वाड्यांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे.

दरवर्षी पंचायत समिती उन्हाळ्यात टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी अराखडा तयार करीत असते. शासन दरवर्षी आपली जबाबदारी पार पाडत असते. काही संस्था, संघटना, फाउंडेशनच्या माध्यमातूनदेखील पाण्याचे टँकर पुरविले जात आहेत.

कर्जत तालुक्यातील आषाणे, पिंगळस, मोग्रज, किरवली, जांभुळवाडी, मेचकर वाडी, फणसवाडी, भक्तीची वाडी, खानन, वर्णे, मोहपाडा या गाव–वाड्यांना पाणीपुरवठा करण्यात येत आहे. कडक उन्हामुळे धरणांतील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असून टंचाईग्रस्त भागातील नागरिकांची पिण्याच्या पाण्याची तहान भागवण्यासाठी टँकर्सद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. महिलांना या वर्षी जास्तच कसरत करावी लागत आहे. गावांमध्ये महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. त्यामुळे प्रशासनाकडून टँकरचे प्रस्ताव वाढू लागले आहेत, अशी माहिती पाणी पुरवठा विभागाकडून देण्यात आली आहे, तसेच संस्था, फाउंडेशनला भेटून त्यांच्याकडून ही पाण्याची मागणी होत आहे.

## निवडक



### कापडी पिशव्या वाटपातून जनजागृती

**कर्जत** : मतदान जनजागृतीसाठी कर्जत नगर परिषदेकडून स्वीप अंतर्गत कापडी पिशव्यांचे करण्यात आले. कापडी पिशव्या मतदारांना देऊन त्यांना मतदान करण्याचे आवाहन कर्मचारी करीत आहेत. शहरातील नागरिकांनी अधिक संख्येने मतदानाचा हक्क बजावावा यासाठी स्वीप अंतर्गत कापडी पिशव्यांवर संदेश लिहून त्या पिशव्यांचे वाटप मतदारांना करण्याचा उपक्रम शुक्रवारी (दि.२६) पालिका मुख्याधिकारी आणि प्रशासक वैभव गारवे यांच्या उपस्थितीत झाला.

### अलिबागमध्ये आज 'नृत्यमय जगत्'

**अलिबाग** : जागतिक नृत्य दिनाच्या पूर्वसंध्येला रविवारी (दि.२८) एप्रिल रोजी संध्याकाळी ६.३० वा. अलिबाग समुद्रकिनारी नमन नृत्य संस्था आणि अलिबाग बीच शो यांच्या संयुक्त विद्यमाने अमोल कापसे दिग्दर्शित नृत्यमय जगत् या कथ्थक नृत्यावर आधारीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. २९ एप्रिल हा दिवस जागतिक नृत्य दिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने अलिबागमधील नमन नृत्य संस्थेच्या कलाकारांनी या दिनाच्या पूर्वसंध्येला अमोल कापसे दिग्दर्शित नृत्यमय जगत् हा कार्यक्रम आयोजित केले आहे. कार्यक्रमात कथ्थक नृत्याच्या वेगवेगळ्या पैलुंना स्पर्श करीत चराचरात सामावलेल्या नृत्य तत्वाशी एकरुप करणारे असे सादरीकरण करण्यात येणार असून अलिबागकर व पर्यटक रसिक प्रेक्षकांसाठी एक पर्वणीच ठरणार आहे.

# स्व. संतोष पवार पत्रकारिता पुरस्कार महेश म्हात्रेंना प्रदान

**कर्जत : प्रतिनिधी**

ज्येष्ठ पत्रकार स्व. संतोष पवार यांच्या स्मृतिप्रित्यर्थ पत्रकारिता पुरस्कार सोहळ्याचे आयोजन माथेरानमध्ये करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख होते, तर प्रमुख पाहुणे ज्येष्ठ वृत्त निवेदक भूषण करंदीकर, मराठी पत्रकार परिषद कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, रायगड प्रेस क्लब अध्यक्ष मनोज खांबे, कार्याध्यक्ष प्रशांत गोपाळे, माजी नगराध्यक्ष अजय सावंत, मनोज खेडकर, चंद्रकांत चौधरी, भाजपा तालुकाध्यक्ष राजेश भगत, प्रवीण सपकाळ, कुलदीप जाधव, शकील पटेल, राजेश चौधरी, पोलीस निरीक्षक अनिल सोनोने, कामगार नेत्या स्मृती म्हात्रे, सुनील गायकवाड, मनीषा पवार, संजीवनी गायकवाड आदी उपस्थित होते.

स्व. संतोष पवार राज्यस्तरीय संपादक पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार महेश म्हात्रे यांना प्रदान करण्यात आला. स्व. सुनील दांडेकर स्मृती रायगड जिल्हास्तरीय पत्रकारिता पुरस्कार खोपोलीचे ज्येष्ठ पत्रकार भाई ओव्हाळ यांना प्रदान करण्यात आला, तर स्व. धर्मानंद गायकवाड तालुकास्तरीय पुरस्कार माथेरान येथील पत्रकार अजय कदम यांना प्रदान करण्यात आला. महेश म्हात्रे यांनी संतोष पवार यांच्या नावाने एखादा उपक्रम करावा म्हणून पुरस्काराची रक्कम कर्जत प्रेस क्लबकडे परत केली.

संजय शिंदे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले. या वेळी नितीन कांदळगावकर, सुहासिनी शिंदे, प्रकाश सुतार, संजय मोहिते, दर्वेश पालकर, राकेश जाधव, विद्यानंद ओव्हाळ, विकास मिरगणे, हृषिकेश कांबळे, संजय अभंगे, दीपक पाटील, दिनेश सुतार, गणेश पवार, अजय गायकवाड, विलास श्रीखंडे, कांता हाबळे, मल्हार पवार, ज्ञानेश्वर बागडे, नरेश जाधव, अनिल गवळे, मुकुंद रांजणे, श्वेता शिंदे, मोतीराम पादिर, गणेश पुरवंत, विपुल माळी, आनंद सकपाळ, नम्रता कांदळगावकर, चंद्रकांत सुतार, मिलिंद कदम, गिरीश पवार आदींसह माथेरानकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## परिशिष्ट क्र. १६

(उपविधी क्र. ३५ अन्वये )

**मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना (मोठ्या प्रमाणामध्ये प्रसारित होणाऱ्या दोन स्थानिक वर्तमान पत्रांमध्ये प्रसिद्धी देण्यात यावी.)**

**नोटीस**

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता नः पनवेल या संस्थेचे सदस्य असलेल्या या संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर / गाळा/ बंगला क्र. ... धारण करणाऱ्या **श्री/जगन्नाथ बाळकृष्ण जाधव** यांचे तारीख **३१/१२/२०१०** रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या/हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून **१५** दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्ट्यर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/ हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे सकाळी/दुपारी ११.०० ते सकाळी/दुपारी **४.००** ता पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : नवीन पनवेल
दिनांक : २७/०४/२०२४

**सही/–**
**सचिव**
**सरकारी नोकर सहकारी गृह निर्माण संस्था मर्या.**
**सेक्टर २, नवीन पनवेल**

# नवी मुंबईतील धोकादायक इमारतींवर 'लक्ष'

## अधिक काळ झालेल्यांना संरचना परीक्षण अनिवार्य

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका कार्यक्षेत्रामधील धोकादायक इमारतीचे सन २०२४–२५ या वर्षासाठी सर्वेक्षण करण्यात आले आहे. सर्वेक्षणानंतर एकूण ५३५ इमारती महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २६४ पोटकलम (१) (२) (३) (४) अन्वये धोकादायक इमारती म्हणून घोषित करण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम २६५(अ) नुसार ज्या इमारतींचा वापर सुरू होऊन ३० वर्षांपेक्षा अधिक काळ लोटला आहे, अशा इमारतींचे नवी मुंबई महापालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्याकडून किंवा संरचना अभियंत्याकडून संरचना परीक्षण करून घेणे अनिवार्य आहे.

३० वर्षापेक्षा जास्त काळ इमारतीचा वापर किंवा इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र (पूर्ण अथवा अंशत:) क्षेत्रफळ वापराखाली आणले गेले अशा दिवसापासून मोजावयाचा आहे. नेमलेल्या संरचना अभियंत्याने शिफारशी केलेली दुरूस्तीची कामे पूर्ण झाल्याचे व ते बांधकाम सुस्थितीत असल्याचे प्रमाणपत्र नवी मुंबई महापालिकेकडे सादर करावे.




या प्रकारे संरचना परीक्षण करण्याचे उत्तरदायित्व जी संस्था अथवा मालक अथवा भोगवटादार पार पाडण्यास टाळाटाळ करतील त्यांना २५,००० रुपये अथवा सदर मिळकतीच्या वार्षिक मालमत्ता कराची रक्कम यातील जी जास्त असेल तितक्या रक्कमेचा दंड ठोठवावयाची तरतूद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३९८ (अ) खाली अंतर्भूत करण्यात आलेली आहे. नवी मुंबई महापालिकेने संरचनात्मक परीक्षक (स्ट्रक्चरल इंजिनियर) यांची यादी नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in संकेतस्थळावर (website) उपलब्ध करून दिलेली आहे.

३० वर्षापेक्षा जास्त काळ झालेल्या इमारतीचे संरचनात्मक परीक्षण दिनांक ३० सप्टेंबर २०२४ पूर्वी पूर्ण करून याबाबतचा अहवाल संबधित विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी किंवा सहाय्यक संचालक नगररचना, नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडे सादर करावयाचा आहे.

धोकादायक झालेल्या इमारतींचा अथवा घरांचा वापर करणे जिकरीचे आहे. त्यामुळे जिवीत व वित्त हानी होऊ शकते म्हणून नागरिकांकडून धोकादायक इमारतींचा अथवा घराचा रहिवास अथवा वापर तत्काळ थांबविण्यात यावा, असे आवाहन करण्यात येत आहे. अन्यथा दुर्दैवी अपघात घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधितांची राहील याची नोंद घेण्यात यावी असे नवी मुंबई महापालिकेच्या वतीने सूचित करण्यात येत आहे.

# बेलापुरात गोमांस विक्रीवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

नवी मुंबई बेलापूर येथे एका दुकानात अवैध मांस विक्री केली जात असल्याची गुप्त माहिती विश्व हिंदू परिषद गौ रक्षा दल व बजरंग दलच्या कार्यकर्ते यांना मिळाली होती. त्यानुसार शहानिशा करून सीबीडी बेलापूर पोलिसांना याबाबतची माहिती देण्यात आली असता, शॉप नं. १, अपना मिनी मार्केट, सेक्टर १, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई येथे ५५ हजार रुपये किमतीचे २५२ किलो गोमांस आढळून आले.

या प्रकरणी अनम बुफे शॉप दुकानाचे मालक मोहंमद शफी शेख छन्नू, मोहसीन अब्दुलहक कुरेशी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



जनावराची अवैधरित्या कत्तल करून गोमांस विक्रीसाठी आणले असल्याची माहिती प्राणीमित्र प्रतीक ननावरे यांना मिळाली होती. कित्येक दिवस या दुकानदारावर लक्ष ठेवण्यात येत होते. प्राणी मित्र प्रतीक ननावरे यांनी ही बाब पोलिसांना सांगितली. सीबीडी पोलीस ठाणेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पराग लोंढे यांनी पाहणी केली असता, मोहसीन अब्दुलहक कुरेशी हे मे. अनम बुफेन शॉप याठिकाणी गायी बैलाचे मटन विक्री करताना आढळून आले. त्यामध्ये बैलाचे पायाचे खुरे व इतर अवयव छोटया छोटया तुकड्यांमध्ये कापून विक्रीसाठी लटकवलेले आढळून आले. सदरचे मांस व अवयव हे गोमांसचे असल्याचे निष्पन्न झाले.

या वेळी दुकानाचे मालक मोहंमद शफी शेख छन्नू यांचेकडे चौकशी करता त्यांनी सदरचे मांस हे बैलाचे असून ते विक्रीसाठी आणले आहे, अशी कबूली त्यांनी पोलिसांनी दिली. त्यांच्याकडे कत्तलीचा परवाना नसून नवी मुंबई महानगरपालिकेचा मांस विक्री व्यवसाय परवाना असल्याचे त्यांनी सांगितले.

या ठिकाणी असलेले मांस हे गोवंश जातीय असल्याचा संशय येत असल्याने सदर मासांची तपासणीसाठी नवी मुंबई पालिकेचे पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. जवादे व डॉ. रत्नप्रभा चव्हाण मुंबई महापालिका यांना स्थानिक पोलिसांनी पाचारण केले होते. दरम्यान, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी मांसाचे परीक्षण केले असता ते गोवंशाचे असल्याचे निष्पन्न झाले.

## निवडक



### मनसेकडून शिक्षकांचा सत्कार

**नवी मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेकडून वाशी येथील सर्व शाळांमध्ये महाराष्ट्र राज्यगीतचे नामफलक लावण्यासाठी निवेदनद्वारे विनंती करण्यात आली होती. सर्व शाळांनी आमच्या विनंतीचा मान राखून त्यांनी त्वरित नामफलक लावण्यास सुरूवात केली. रज्यागित हे अवघ्या मराठी जनांसाठी स्फूर्तीगीत आहे. ते दर्शनी भागात असणे आवश्यक आहे. त्यास शाळा प्रतिसाद देत असल्याचे मनसेने सांगितले. सर्व शाळांमधील मनविसेकडून प्राचार्यांचा शाल व श्रीफळ देऊन कृतज्ञता व्यक्त केली. या वेळी विक्रांत मालुसरे, विशाल भणगे, शुभम भोईर, अभिजित आगरे, अनिरुद्ध मेंगडे, गुरुनाथ गायकवाड, जुबैर अन्सारी, जयपाल पवार, शेखर, अण्णा राव आदी उपस्थित होते.

### अरुण जाधव यांना अवार्ड

**मोहोपाडा :** आपले आदर्श मुंबई फाऊंडेशन व



इंटरनॅशनल ह्यूमन राईट्स सेवा संघाच्या १२व्या वर्धापन दिनानिमित्त विक्रोळी येथे नुकतेच महाराष्ट्रातील गुणवंतांचा व समाजसेवकांना 'एक्सलन्स स्टार' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ. संजय भोईर, भालचंद्र पाटे, अशोक भोईर, पूनम पाटगावे यांच्यातर्फे सामाजिक, साहित्य, शिक्षण, वैद्यकिय, उद्योग, कला, क्रीडा, सरपंच क्षेत्रात उल्लेखनीय समाजकार्य करणाऱ्या आदर्शकांचा गौरव करण्यात आला. या वेळी रसायनीतील पाताळगंगा नदी व पर्यावरण संवर्धन संस्थेचे अध्यक्ष अरुण जाधव यांना नॅशनल एक्सलन्स स्टार अवार्डने सन्मानित करण्यात आले.

# सानपाडा उड्डाणपुलावरील कामे लवकर पूर्ण करण्यासाठी निवेदन

**नवी मुंबई : बातमीदार**

सायन–पनवेल मार्गावर सानपाडा उड्डाण पुलालगत दोन्ही बाजूला रस्ता दुरुस्ती व गटार लाईनवरील जाळ्या दुरुस्ती सुरू आहे. तसेच काँक्रीटीकरणची सुरू आहेत. ही कामे वेळेत पूर्ण करून कामाचा दर्जा सुधारणे बाबत मनसे सहकार सेना बाळासाहेब शिंदे यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, तुर्भेचे उप अभियंता पवार यांना रात्री बारा वाजता नेरूळ एल. पी. ब्रीज वर भेटून निवेदन दिले.



सायन–पनवेल महामार्गावर बऱ्याच ठिकाणी रस्ते दुरुस्ती मोठ्या प्रमाणात सुरू असल्याने वाहतूक कोंडी होत असते, परंतु वाहतूक विभाग चांगल्या प्रकारे वाहतूक नियंत्रण करत असल्याने वाहतूक कोंडी नियंत्रणात येत असल्याचे दिसून येते, परंतु सानपाडा सिग्नल जवळ उड्डाण पुलाचे दोन्ही बाजूला आपल्याकडून रस्त्याचे काम करण्यात आले असून फुटपाथ जवळचा रस्त्याचा काही भाग हा आपणाकडून दुरुस्त न झाल्याने व गटारावरील जाळ्या तुटलेल्या असल्याने या ठिकाणी एस. टी.थांबा व खाजगी बस वाहतूक दारांना प्रवासी वाहतूक करत असताना या ठिकाणी रस्त्याच्या बाजूला वाहन उभे करताना अडचणी येत असून या ठिकाणी नाहक वाहतूक कोंडी होत आहे.

या ठिकाणी गटारे उघडी असल्याने वाहन यात अडकल्यास किंवा प्रवासी खड्यात पडण्याची शक्यता आहे. या ठिकाणची अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून तत्काळ रस्ता व गटार वरील जाळ्या दुरुस्ती करून नागरिक, प्रवासी व वाहतूकदार यांना होणारा त्रास कायम स्वरुपी संपुष्टात आणणे आवश्यक आहे. तसेच सायन पनवेल महामार्गावर मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या काँक्रीटीकरणची कामे वेळेत पूर्ण करण्यात यावीत तसेच कामाचा दर्जा सुधारण्यात यावा अशी मागणी शिंदे यांनी केली आहे.

या वेळी सार्वजनिक बांधकाम विभाग उप अभियंता पवार यांनी रात्री बारा वाजता आमचे निवेदन स्वीकारून एल पी. व सानपाडा उड्डाण पूल या ठिकाणी कामांची पाहणी करून, मालाचा दर्जा चेक करून संबधित ठेकेदारास सज्जड दम देवून वेळेत काम करून घेवू असे आश्र्वासन दिले. या वेळी महाराष्ट्र नवनिर्माण सहकार सेना प्रदेश उपाध्यक्ष, बाळासाहेब शिंदे, शाखा अध्यक्ष तुषार मराठे, मनोज देसाई, रोहित खोत, प्रथमेश शिंदे, ऋतीक लाड, सागर लाड, पांडरंग झोरे आदी उपस्थित होते.

# पथनाट्यातून मतदान जनजागृती




**नवी मुंबई : बातमीदार**

## सेंट झेवियर्स शाळेचा उपक्रम

सेंट झेवियर्स हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेजच्या शिक्षकांमार्फत २० मे २०२४ रोजी होणाऱ्या पाचव्या टप्प्यातील लोकसभेच्या निवडणुकांच्या अनुषंगाने मतदान जागृती उपक्रम राबविण्यात आला. वाशी रेल्वे स्थानक, सेक्टर ९ व सेक्टर ६ चे मार्केट आणि मिनी सीशोर परिसरात शिक्षकांनी पथनाट्याच्या माध्यमातून मतदानाच्या अधिकारांचे महत्त्व विषद केले

पथनाट्यातून १८ वर्षे पूर्ण केलेल्या व्यक्ती मतदानाच्या अधिकारास पात्र आहेत, ८५ वर्षांवरील व्यक्ती १२ डी फॉर्म भरल्यास घरबसल्या मतदान करू शकते. तसेच मतदान केंद्रावरील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृह, रॅम्प, व्हील चेअर अशा सुविधांविषयी माहिती देण्यात आली.

नागरिकांनी उस्फूर्तपणे मत व्यक्त करून शिक्षकांच्या पथनाट्याचे कौतुक करून उपक्रमाची प्रशंसा केली. या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन मनीषा अंधाणसरे व त्यांच्या सहकाऱ्यां मार्फत करण्यात आले. उपक्रमास उत्तर भारतीय मोर्चाचे नवी मुंबई अध्यक्ष राजेश राय, हायकोर्ट ॲड. आशुवर्धन, कल्पना छत्रे, प्रताप भोसकर इत्यादी उपस्थित होते.

# अनधिकृत व्यवसायांना आळा घालण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सिवुड्स (पश्चिम) विभागात गेल्या काही वर्षापासून रस्त्यावर गॅस सिलेंडरचा वापर करून अनधिकृतपणे खाद्य पदार्थ विकण्याचा प्रयोग सुरू आहे. ही बाब धोकादायक असून, कसलेही निकष या निमित्ताने पाळले जात नाहीत. पोलिसांनी अशांवर पलिकेसोबत कारवाई करून या अनधिकृत व्यवसायांना आळा घालावा, अशी मागणी संकल्प सोशल कल्चरल व वेल्फेअर असोसिएशनचे संस्थापक विशाल डोळस यांनी पोलीस आयुक्तांना पत्र देऊन केली आहे.

रस्त्यावर खाद्य पदार्थ बनवून विकत आहे. त्यामुळे नागरिकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. त्याबरोबरच सिवूड्समधील प्रत्येक वळणाला अनधिकृतपणे रिक्षा उभ्या असतात. याशिवाय मॉल समोरील एकदम अरुंद रस्त्याला रिक्षा एका मागे एक उभ्या राहतात त्यावर ही कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही. रिक्षा चालकांच्या बेशिस्तपणामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे ह्या सर्व गोष्टी रात्री ८ नंतर जास्त होतात. तसेच सेक्टर ४० येथील वाईन शॉपच्या बाहेर अनेक खाद्यपदार्थ विकले जातात जिथे उभे राहून ग्राहक तिथेच बॉटलमध्ये दारूचे सेवन करतात. त्या पूर्ण रस्त्यात ठिकठिकाणी रिक्षा ड्रायव्हर रिक्षात, गाड्या उभ्या करून त्याच ठिकाणी दारूचे सेवन करतात. तसेच आजूबाजूला झाडाच्या खाली दारूचे सेवन सुरू असते. तरी आपण ह्या सर्व घडामोडींवर आळा घालावा.

सिवुड्सची परिस्थिती दिवसेंदिवस खराब होत चालली आहे. तरी आपण योग्य ती कारवाई करून सदर विभाग सुरक्षित करावा, अशी मागणी विशाल डोळस यांनी केली आहे.

# चिरनेरमध्ये दीड एकरात घेतले २५ टन ऊसाचे उत्पादन

**उरण : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील चिरनेर हे शेतीसाठी प्रसिद्ध गाव असून सध्या सुरू असलेल्या उन्हाच्या लाटेत गावात कोकणातील जमिनीत ऊस उत्पादन करून त्याचा ताजा रस काढून विकला जात आहे. दीड एकरावर हा ऊस पिकवला जात आहे. मागील पंधरा वर्षांपासून हा प्रयोग यशस्वी ठरला आहे. कोकणात प्रामुख्याने रायगड जिल्ह्यात उसाच्या शेतीसाठी पोषक हवामान नसून देखील उसाची शेती यशस्वी करून लाखो रुपयांचे उत्पन्न घेत आहे.

या उसाच्या शेतीने रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना या शेतकऱ्यांनी एक आदर्श निर्माण करून दिला आहे. या शेतकऱ्याने आपल्या शेतात उसाची लागवड करून पारंपरिक भातशेतीतील उत्पन्नापेक्षा कितीतरी पटीने अधिक उत्पन्न काढून दाखविले आहे. संदीप किसन गोंधळी आणि संग्राम किसन गोंधळी हा तरुण शेतकरी आपल्या शेतात उसाची शेती लाऊन चांगले उत्पन्न कमावीत आहेत. संदीप–संग्रामचे वडील किसन गोंधळी हे प्रगतिशील शेतकरी म्हणून परिचित होते. ते उसाच्या रस विक्रीचा व्यवसाय करत होते. या व्यवसायासाठी ते पनवेल येथून ऊस विकत आणत होते, मात्र प्रवास आणि वाहतूक खर्चामुळे नेहमी शेतीत नवनवीन प्रयोग करणाऱ्या किसन गोंधळी यांनी त्यांच्या शेतात ऊस लागवडीचा प्रयोग केला आणि त्यात त्यांना यश आले. तेव्हापासून ते त्यांच्या दीड एकरच्या शेतामध्ये उस लागवड करून चांगले उत्पन्न मिळवू लागले आहेत. किसन गोंधळी यांच्या आकस्मिक मृत्यूनंतर त्यांच्या संदीप आणि संग्राम या दोन मुलांनी त्यांची शेतीची



जबाबदारी उचलून उसाची शेती करणे सुरू ठेवले आहे. आणि तेदेखील उसाच्या शेतीतून चांगले उत्पन्न मिळवत आहेत.

ते म्हणतात की, पनवेल येथे आम्ही शेतीबरोबर उसाच्या रसाचा जोड धंदा करत आहोत. वर्षातून आठ महिने आम्ही उसाचा चरख्याचा व्यवसाय करतो. दिवसाला सरासरी तीन ते चार हजार रुपयांचा व्यवसाय आम्ही करतो. त्यासाठी आम्हाला पनवेलवरून आठ–दहा रुपये किलोने ऊस आणावा लागतो. मात्र हा ऊस ताजा नसल्याने या उसाचा रस कमी मिळतो. मात्र आमच्या शेतात पिकविलेल्या उस हा ताजा असल्याने त्यामधून जास्त रस मिळतो. गोंधळी बंधू या उसाच्या शेतीतून एकराला २५ टन उसाचे उत्पादन काढतात. आणि याच उसाचा त्यांच्या स्वत:च्या रसवंतीगृहात रस काढून विकल्यामुळे त्यांना फक्त पाच ते सहा महिन्यांत एका हंगामाला साधारणपणे चार ते साडेचार लाख रुपयाचे उत्पन्न मिळते. यासाठी त्यांना मजुरी, मशागत, खते, आणि बियाण्यासाठी पन्नास ते साठ हजारांचाच हंगामात खर्च येतो.

प्रगतिशील शेतकरी म्हणून संदीप आणि संग्राम गोंधळी यांची रायगड जिल्ह्यात ओळख तयार झाली आहे. ऊसाच्या शेतीबरोबरच ते स्वत: चरखा चालवून ताज्या उसाच्या रसाची विक्री पनवेल येथे येऊन करतात.

### तीन वर्षे टिकणारी शेती

उसाची शेती तीन वर्षे टिकत असल्याने तेवढा लागवडीचा खर्च वाचतो. गोंधळी यांच्या मालकीच्या असलेल्या दीड एकर शेतीमध्ये आठ गुंठे जागेवर त्यांनी तळे खोदले आहे. त्या तळ्यातील पाणी हे या उसाच्या शेतीसाठी वापरतात. या शेततळ्यातून त्यांना वर्षभर पाणी तर पुरतेच शिवाय ५० हजारांपर्यंत मासळी पण मिळते. या तेवढ्याच शेतीत भाताचे उत्पादन वर्षाला फक्त २० हजारांच्या आसपासच निघाले असते. त्यासाठी उत्पादन खर्च पण जास्त येतो त्यामुळे उसाची शेती परवडणारी असल्याचे मत गोंधळी यांनी व्यक्त केले.

# नवी मुंबईतील शाळेमध्ये ॲस्ट्रॉनॉमी लॅबची स्थापना



**नवी मुंबई : बातमीदार**

हेंकेल ॲधेसिव्ह्ज टेक्नॉलॉजीज इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (हेंकेल इंडिया)ने ग्लोबल मिशन ॲस्ट्रॉनॉमी, इंडियासोबत सहयोगाने आर. एफ. नाईक विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज, कोपरखैरणे येथे आर्यभट्ट ॲस्ट्रॉनॉमी लॅब स्थापना केली आहे.

हेंकेल इंडियाच्या आर्थिक वर्ष २०२४–२५साठी सीएसआर योजनेंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या या ॲस्ट्रॉनॉमी लॅब चे उद्घाटन हेंकेल आयएमईएचे प्रादेशिक फायनान्स प्रमुख बुलेंट पेहलिवान, हेंकेले इंडियाचे कंट्री प्रेसिडण्ट एस. सुनिल कुमार, हेंकेल इंडिया व पाकिस्तानचे फायनान्स प्रमुख कृष्णा प्रसाद, श्रमिक शिक्षण मंडळाचे प्रमुख विश्वस्त डॉ. संजीव नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान डॉ. प्रसाद खंडागळे, भूपेश सिंग, कुंजेल पारेख, डॉ जगदीश कपाडिया, संदीप पाचपांडे, संदीप पेटकर, विशाल कुंभारे , प्राचार्य रवींद्र पाटील , नरेंद्र म्हात्रे उपस्थित होते.

# रायगडात आता ३४.३२ टक्केच जलसाठा

## अनेक ठिकाणी टंचाईग्रस्त स्थिती; टँकरने पाणीपुरवठा

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील धरण क्षेत्रातील पाणीसाठा वेगाने कमी होताना दिसत आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील २८ धरणात केवळ ३४.३२ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे उपलब्ध पाणीसाठा नियोजनबद्ध वापरण्याची आवश्यकता आहे.



रायगड जिल्ह्यात सर्वांत कमी पाण्याचा साठा मुरूड तालुक्यातील फणसाड धरणात व महाड तालुक्यातील कोथुर्डे धरणात आठ टक्केच पाणीसाठा उपलब्ध आहे. सर्वाधिक पेण तालुक्यातील आंबेघर धरणात ७२ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. इतर आठ धरण क्षेत्रात २० टक्केपेक्षा कमी पाणीसाठा उपलब्ध आहे. पावसाळा येण्यासाठी अद्याप दिड महिना शिल्लक आहे. त्यामुळे पाण्याचा वापर काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे

याव्यतिरिक्त तळा तालुक्यातील वावा धरणात ४७ टक्के, रोहा तालुक्यातील सुतारवाडी धरणात ३७ टक्के, अलिबाग तालुक्यातील श्रीगाव धरणात १३ टक्के, सुधागड तालुक्यातील कोंडगाव धरणात १७ टक्के, घोटवडे धरणात १७ टक्के, ढोकशेत धरणात १४ टक्के, कवेळे धरणात २३ टक्के, उन्हेरे धरणात १९ टक्के, श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरणात ४६ टक्के, कुडकी धरणात ६१ टक्के, रानिवली धरणात २७ टक्के, म्हसळा तालुक्यातील पाभरे धरणात ४१ टक्के, संदेरी धरणात ६० टक्के, महाड तालुक्यातील वरंध धरणात ३८ टक्के, खिंडवाडी धरणात ३२ टक्के, कोथुर्डे धरणात आठ टक्के, खैरे धरणात २९ टक्के, कर्जत तालुक्यातील साळोख धरणात ३८ टक्के, अवसरे धरणात १९ टक्के, खालापूर तालुक्यातील भिलवले धरणात ४१ टक्के, कलोते मोकाशी धरणात २७ टक्के, डोणवत धरणात २३ टक्के, पनवेल तालुक्यातील मोरबे धरणात ४७ टक्के, बामणोली धरणात ५२ टक्के, उसरण धरणात ७० टक्के, उरण तालुक्यातील पुनाडे धरणात ३५ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

## निवडक

### काजल पाखुर्डे यांना कलारत्न पुरस्कार

**माणगाव** : येथील काजल डान्स अकॅडमीच्या संस्थापिका




काजल अजित पाखुर्डे यांना अविष्कार फाउंडेशन रायगड जिल्हा शाखेतर्फे राज्यस्तरीय कलारत्न गौरव पुरस्कार २०२४ जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण १२ मे रोजी कोल्हापूर येथे होणार आहे. काजल पाखुर्डे यांची निवड झाल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. त्यांना त्यांच्या अकॅडमीमध्ये हे निवडपत्र फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे यांच्या हस्ते देण्यात आले. त्या वेळी काजलच्या समवेत तिची आई कल्पना पाखुर्डे उपस्थित होती. काजल पाखुर्डे या आपल्या अकॅडमीमध्ये विद्यार्थ्यांना नृत्याचे शिक्षण देतात. त्यांनी आजपर्यंत अनेक नृत्य कलाकार घडविले आहेत.

### एस.टी. धुमाळ यांना सेवानिरोप



**चौक** : खालापूर तालुका कृषी पर्यवेक्षक एस. टी. धुमाळ यांची पदोन्नती होऊन त्यांची कृषी मंडळ अधिकारी म्हणून बुलढाणा येथे बदली झाल्याने त्यांचा निरोप समारंभ तालुका कृषी अधिकारी कार्यालय खोपोली यांनी आयोजित केला होता. या वेळी एस. टी. धुमाळ यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. खालापूर मंडळ कृषी अधिकारी जे. के. देशमुख, कृषी परीवेक्षक चौक नितीन महाडिक, पत्रकार अर्जुन कदम, पर्यवेक्षक, कर्मचारी उपस्थित होते.


### वाहतूक पोलिसांची धडक कारवाई

**अलिबाग** : जिल्ह्यात सध्या पर्यटन हंगाम सुरू झाला असल्याने मोठ्या संख्येने पर्यटक दखल होत आहेत. या पार्श्वभूमिवर वाहतूक पोलिसांनीही कंबर कसली आहे. जिल्ह्यात शनिवारी (दि.२७) २८ पोलीस ठाण्यांतर्गत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहतुकीचे नियमभंग करणाऱ्या एकूण १७२ चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून ९९ हजार ९०० रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या धडक कारवाईमुळे बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या चालकांचे धाबे दणाणले आहेत.

## मुंबई-पुणे महामार्गावर बर्निंग बसचा थरार

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर वाहने जळण्याच्या घटना वारंवार घडत असल्याने वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पुणे द्रुतगती महामार्गावर वडगावनजीक शनिवारी (दि.२७) खासगी प्रवासी बसला सकाळी ७ वा.च्या दरम्यान अचानक आग लागली. बसचा टायर फुटून शॉर्टसर्किटने ही आग लागल्याचे बोलले जाते.



बसमध्ये ३६ प्रवासी होते. सर्व प्रवासी सुखरूप असल्याचे सुरक्षा यंत्रणांनी सांगितले. घटना घडताच आयआरबी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, अग्निशामक दल त्याचप्रमाणे हायवे पोलीस घटनास्थळी दाखल होत आग विझवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले. काही काळ महामार्गावरील वाहतूक थांबविण्यात आली होती. आग विझविल्यानंतर अपघातग्रस्त बस बाजूला करून वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

## माणगाव कावीळवहाळ कोंडमधील कार्यकर्ते शिवसेनेत

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील कावीळवहाळ कोंड गावातील ठाकरे गटातील कार्यकर्त्यांनी शनिवारी (दि.२७) आमदार भरत गोगावले यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत प्रवेश केला.



या कार्यक्रमात आमदार भरत गोगावले म्हणाले की, गावात अनेक विकासकामे आपण केलेली आहेत. गावातील राधा-कृष्ण मंदिराच्या जीर्णोद्वाराचे काम आपण करू. दीड वर्षांत आपण मतदारसंघातील ५० मंदिरांच्या कामांना निधी उपलब्ध करून दिला. आम्ही विकासकामांसाठी बांधिल आहोत. आपणही आमच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे. येत्या ७ मे रोजी रायगड लोकसभा मतदारसंघाची निवडणूक होत असून सुनील तटकरे हे आपल्या महायुतीचे उमेदवार आहेत. त्यांची निशाणी घड्याळ असून आपल्याला घड्याळासमोरील बटण दाबून सुनील तटकरेंना प्रचंड मतांनी निवडून दिल्लीत पाठवायचे आहे.

शिवसेना दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर म्हणाले की, आम्ही सारी मंडळी विकासकामांना प्राधान्य देणारी असून रायगड लोकसभा निवडणुकीत आपण सर्वांनी महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांना मतदान करून प्रचंड मतांनी निवडून देण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास जिल्हा संपर्कप्रमुख अरुण चाळके, युवा सेना जिल्हा प्रमुख विपुल उभारे, जिल्हा महिला आघाडी प्रमुख नीलिमा घोसाळकर, संघटिका अरुणा वाघमारे, माजी सभापती महेंद्र तेटगुरे, विभाग प्रमुख रवींद्र टेबे, प्रताप घोसाळकर, प्रमोद खेतम, ज्ञानदेव अंबावले, ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमात गावातील उच्च शिक्षण घेतलेल्या सुशील रक्ते यांचा सत्कार करण्यात आला.

## पेणमध्ये शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून मतदार जागृती

**पेण : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदारसंघातील पेण विधानसभा मतदारसंघांमध्ये सहाय्यक निवडणूक अधिकारी प्रवीण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी (दि.२६) उपविभागीय अधिकारी कार्यालयापासून मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली.

पेण, सुधागड, रोहा तालुक्यातील सर्व सरकारी अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या रॅलीमध्ये मतदान जनजागृतीपर पोवाडे, स्लोगन, घोषणा संतोष पाटील म्युझिक ग्रुपकडून सादर करण्यात आले. कर्मचाऱ्यांच्या हातात मतदान जनजागृतीचे फलक घेण्यात आले होते. या रॅलीमध्ये उपविभागीय अधिकारी प्रवीण पवार, पेण तहसीलदार तानाजी शेजाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे, पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, वनक्षेत्र अधिकारी कुलदिप पाटकर, नगरपालिकेचे मुख्याधिकारी जीवन पाटील, नायब तहसिलदार प्रसाद कालेकर, गटविकास अधिकारी भाऊसाहेब पोळ, गटशिक्षण अधिकारी अरुणा देवी मोरे यांच्यासह शाळा, महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, शिक्षकही सामील झाले होते.

ही रॅली धरमतर रोड मार्गे, कोतवाल चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, चावडीनाका आणि आरटीओ कार्यालयापर्यंत येऊन रॅलीची सांगता करण्यात आली.



## खोपोली येथे पोलिसांकडून वाहनांची तपासणी



**खोपोली : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा सार्वत्रिक निवडणुकींतर्गत कर्जत विधानसभा मतदारसंघात खोपोली शहरातील मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील शिळफाटा वनविभाग चौकीजवळ निवडणूक यंत्रणा व पोलिसांकडून वाहन तपासणी करण्यात येत आहे. ही तपासणी १८ एप्रिल ते १३ मेपर्यंत सुरू राहणार असल्याचे निवडणूक यंत्रणेतील राजेंद्र कोलटक्के (पथक प्रमुख) यांनी सांगितले.

चालकाचे नाव, वाहन नंबर, प्रवास तपासणीची वेळ आदी माहिती वाहनचालकांकडून घेण्यात येत आहे. त्याप्रमाणे वाहनांची पूर्णपणे तपासणी करण्यात येत आहे. शनिवारी सकाळपासून शिळफाटा वनविभागाच्या चौकीजवळ पथकाकडून वाहनांची तपासणी करण्यात येत आहे.

या तपासणीदरम्यान राजेंद्र कोलटक्के यांच्या नेतृत्वाखाली अतुल वाघ, पोलीस शिपाई आर. एम. सोनवणे, अंकुश पोले, शिवाजी लोरे, मोरे आदी उपस्थित होते.

## ऐन लग्नसराईत फुले महागली

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

एप्रिल महिन्यापासूनच विवाहाचे मुहूर्त असल्याने ठिकठिकाणी विवाह सोहळ्यांची धूम सुरू आहे. त्याचा परिणाम फुलांच्या दरावर झाला असून, मोगऱ्यापासून गुलाबापर्यंतच्या फुलांचे दर ५० ते १०० रुपयांपर्यंत वाढले आहेत.

फूल बाजारपेठेत नांदेड, मुदखेड, पुणे, परतूर आदी भागातून विविध फुले विक्रीसाठी येतात. या महिन्यामध्ये लग्न सोहळ्यासाठी फुलांना आणि हारांना सर्वाधिक मागणी आहे. यामध्ये मोगरा, जरबेरा, गुलाब, निशिगंधा या फुलांचा सर्वाधिक वापर होतो. मागील काही दिवसांमध्ये वाढलेल्या उन्हामुळे फुलांचे उत्पादन घटले आहे, मात्र समारंभांमुळे मागणी वाढली आहे. त्याचा परिणाम दरावर झाला आहे.

लग्न सोहळ्यानिमित्त नवरदेवाच्या वरातीसाठी, लग्न परतणीसाठी वापरले जाणारे वाहन, कार विविध फुलांनी सजविले जाते. या वाहनाची सजावट करण्यासाठी अधिकचे पैसे मोजावे लागत आहेत.

ही सजावट ही पूर्वीपेक्षा महागल्याचा फटका लग्नसराईमध्ये वधू-वराच्या कुटुंबाला सहन करावा लागत आहे.



## रोहा मोहल्ल्यात महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांचा प्रचार

**सर्वाधिक मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार**

**रोहे : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी रायगड जिल्ह्यात सर्वत्र सुरू आहे. शहरात महायुतीच्या कार्यकर्त्यांच्या वतीने रोहा मोहल्ला येथे प्रचारफेरी काढण्यात आली. या प्रचारफेरीत मोठ्या संख्येने मुस्लिम समाज बांधव सहभागी झाले होते.

या वेळी माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, माजी नगराध्यक्ष पूर्वा मोहिते, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, भाजप शहराध्यक्ष यग्नेश भांड, राष्ट्रवादी महिला अध्यक्ष प्राजक्ता चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, माजी उपनगराध्यक्ष रिदवाना शेटे, माजी उपनगराध्यक्ष शिल्पा धोत्रे, माजी उपनगराध्यक्ष पूजा पोटफोडे, माजी नगरसेवक अफरीन रोगे, युवक शहर अध्यक्ष माज सवाल, रियाज शेटे, कादीर रोगे, सर्फराज बंदरकर आदींसह कार्यकर्ते सहभागी झाले होते.

शहरात २५ व २६ एप्रिल रोजी शहरातील रोहा वरचा मोहल्ला, खालचा मोहल्ला, डोंगरी मोहल्ला, महात्मा फूले नगर, मिल्लत नगर, सिद्धार्थ नगर, म्हाडा वसाहत आधी ठिकाणी महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून सुनील तटकरे यांचा प्रचार करण्यात आला. या प्रचार दौऱ्यात मुस्लिम समाज बांधव सहभागी झाले होते. कार्यकर्त्यांनी या परिसरात उमेदवार सुनील तटकरे यांचे पत्रके वाटली.


महायुतीच्या कार्यकर्त्यांकडून सुनील तटकरे यांना सर्वाधिक मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार केला असल्याचे या वेळी सांगण्यात आले.



## प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क बजावावा -साईनाथ पवार

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यात मतदार जनजागृती कार्यक्रम विविध माध्यमातून राबविण्यात येत आहे. तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींना आपल्या सर्वोच्च लोकशाहीचा मतदानाचा अधिकार बजावता यावा यासाठी तहसील कार्यालय आणि दिव्याग संस्थांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती कार्यक्रम चवदार तळे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात राबविण्यात आला.



या वेळी तहसीलदार महेश शितोळे यांनी, प्रत्येकाने मतदान हे कर्तव्य समजून मतदानाचा हक्क बजावावा, असे दिव्यांगांना मार्गदर्शन करीत लोकशाहीमध्ये प्रत्येकाला मतदानाचा हक्क असून आपला हक्क बजावण्यासाठी प्रत्येकाने पुढे येऊन मतदान केले पाहिजे, असे आवाहन केले. दिव्यांग व्यक्तींना प्रत्येक मतदान केंद्रावर मतदानासाठी विविध मार्गातून सहकार्य मिळवून दिले जाणार आहे.

महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे राज्याध्यक्ष साईनाथ पवार यांनी, सर्व दिव्यांग बांधवांनी कोणताही भीती मनात न बाळगता ७ मे रोजी होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये पुढे येऊन मतदान केले पाहिजे, असे सांगितले. प्रत्येकाने आपले स्वकर्तृत्व समजून मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहनही या वेळी केले आहे.

या वेळी व्यासपीठावर तालुकाध्यक्ष सुरेश पाटील, खजिनदार मुबिन देशमुख, सचिव अनिल जाधव, संस्था अध्यक्ष दीप्ती शेडगे यांच्यासह शेकडो दिव्यांग मतदार उपस्थित होते.

# पंजाबचा ऐतिहासिक विजय

## २६२ धावांच्या लक्ष्याचा यशस्वी पाठलाग

**कोलकाता : वृत्तसंस्था**

आयपीएल स्पर्धेच्या इतिहासात धावांचा पाठलाग करतानाचा नवा विक्रम रचत पंजाब किंग्ज संघाने कोलकाता नाईट रायडर्स संघाविरुद्ध ऐतिहासिक विजय साकारला. इडन गार्डन्सच्या मैदानावर चौकार-षटकारांची लयलूट झालेल्या लढतीत कोलकाताने २६१ धावांचा डोंगर उभारला होता. पंजाबच्या फलंदाजांनी वादळी खेळी रचत अशक्यप्राय वाटणारा विजय साकारला. पंजाबने आठ चेंडू आणि आठ विकेट्स राखून संस्मरणीय विजय मिळवला.



शतकवीर जॉनी बेअरस्टोने पंजाबच्या विजयाचा पाया रचला. प्रभसिमरन सिंग, रायली रुसो आणि शशांक सिंग यांनी बेअरस्टोला तोलामोलाची साथ देत थरारक विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. बेअरस्टोने ४८ चेंडूंत नाबाद १०८ धावांची, तर शशांक सिंगने २८ चेंडूंत नाबाद ६८ धावांची खेळी साकारली.

पंजाबने प्रयोग सुरू ठेवत जॉनी बेअरस्टोच्या बरोबरीने प्रभसिमरन सिंगला सलामीला पाठवले. हा प्रयोग यशस्वी ठरला. प्रभसिमरन-बेअरस्टो जोडीने पॉवरप्लेमध्येच ९३ धावांची तडाखेबंद सलामी दिली. प्रभसिमरनने १८ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. सुनील नरेनच्या अचूक धावफेकीमुळे प्रभसिमरन बाद झाला. त्याने २० चेंडूंत चार चौकार आणि पाच षटकारांसह ५४ धावांची खेळी केली. प्रभसिमरन बाद झाल्यानंतर रायली रुसोने बेअरस्टोला चांगली साथ दिली. संघातून वगळल्यानंतर कसून सराव केलेल्या बेअरस्टोने चौकार, षटकारांची आतषबाजी केली. बेअरस्टो-रुसो जोडीने दुसऱ्या विकेटसाठी ३९ चेंडूंत ८५ धावा रचल्या. सुनील नरेननेच रुसोला माघारी परतावले. त्याने १६ चेंडूंत २६ धावा केल्या.

रुसोच्या जागी आलेल्या शशांक सिंगने पहिल्या चेंडूपासून कोलकाताच्या गोलंदाजांना पिटाळून लावले. एकामागोमाग एक षटकार लगावत शशांकने धावगतीचे दडपण खाली आणले. बेअरस्टोने प्रचंड उकाडा आणि आर्द्रता अशा वातावरणातही ४५ चेंडूंत शतक साजरे केले. दुसरीकडे शशांक सिंगने २८ चेंडूंत दोन चौकार आणि आठ षटकारांसह नाबाद ६८ धावा करीत पंजाबच्या स्वप्नवत विजयावर शिक्कामोर्तब केले. या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी ३७ चेंडूंत तब्बल ८४ धावा कुटल्या.

तत्पूर्वी २२ चौकार आणि १८ षटकारांच्या बळावर कोलकाताने २६१ धावांचा डोंगर उभारला होता. फिल सॉल्ट आणि सुनील नरेन यांनी १३८ धावांची खणखणीत सलामी दिली. या जोडीने पंजाबच्या गोलंदाजांच्या ठिकऱ्या उडवल्या. शतकाकडे वाटचाल करणाऱ्या नरेनची खेळी राहुल चहरने संपुष्टात आणली. त्याने ३२ चेंडूंत नऊ चौकार आणि चार षटकारांसह ७१ धावांची खेळी केली. विकेटकीपिंग आणि सलामी अशा दोन्ही भूमिका निभावणाऱ्या सॉल्टने पॉवरप्लेनंतरही फटकेबाजी सुरूच ठेवली. सॅम करनच्या गोलंदाजीवर चौकार-षटकारांची लयलूट केल्यानंतर एका सुरेख यॉर्करवर तो त्रिफळाचीत झाला. त्याने ३७ चेंडूंत सहा चौकार आणि सहा षटकारांसह ७५ धावा चोपल्या.

चौथ्या क्रमांकावर बढती मिळालेल्या आंद्रे रसेलने टोलेबाजीला सुरुवात केली, पण अर्शदीपने त्याचा झंझावात रोखला. रसेलने १२ चेंडूंत दोन चौकार आणि दोन षटकारांसह २४ धावा केल्या. कर्णधार श्रेयस अय्यर आणि वेंकटेश अय्यर जोडीने चौथ्या विकेटसाठी १८ चेंडूंत ४३ धावा जोडल्या आणि कोलकाताने अडीचशेचा टप्पा ओलांडला. धावबाद होण्यापूर्वी वेंकटेशने २३ चेंडूंत ३९ धावांची खेळी केली, तर श्रेयसने १० चेंडूंत २८ धावा कुटल्या. कोलकाता एकाक्षणी तीनशेचा टप्पा ओलांडणार असे चित्र होते, पण पंजाबच्या गोलंदाजांनी चांगले पुनरागमन केले. पंजाबकडून अर्शदीपने दोन, तर सॅम करन, हर्षल पटेल, राहुल चहर यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# मुंबईची हाराकिरी सुरूच

## दिल्लीकडून मात; जेक फ्रेझरचे वादळी अर्धशतक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



मुंबई इंडियन्सला यंदाच्या आयपीएलमध्ये सहाव्या पराभवाचा सामना करावा लागला. दिल्ली कॅपिटल्सने उभ्या केलेल्या २५७ धावांचा पाठलाग करताना मुंबईला अपेक्षित सुरुवात नाही मिळाली आणि त्यांची मधली फळीही ढेपाळली. जेक फ्रेझर-मॅकगर्क याच्या वादळी अर्धशतकानंतर मुकेश कुमार, खलील अहमद व रसिख सलाम (३-३६) यांनी चांगली गोलंदाजी करून दिल्लीला सामना जिंकवून दिला.


इशान किशन व रोहित शर्मा यांच्याकडून मुंबईला आक्रमक उत्तराची अपेक्षा होती, पण रोहित आठ धावा करून माघारी परतला. इशान आणि सूर्यकुमार यादव प्रत्येकी २० धावा करून बाद झाले. कर्णधार हार्दिक पांड्याने चौथ्या विकेटसाठी तिलक वर्मासह ३९ चेंडूत ७१ धावा केल्या. हार्दिक चांगल्या फॉर्मात दिसत होता, मात्र २४ चेंडूत चार चौकार व तीन षटकारांसह ४६ धावांवर बाद झाला. नेहाल वढेरा चारच धावा करू शकला. टीम डेव्हिड १७ चेंडूत दोन चौकार व तीन षटकारांसह ३७ धावांवर बाद झाला. शेवटी तिलक ३२ चेंडूत चार चौकार व चार षटकारांसह ६३ धावांवर बाद झाला. मुंबईला ९ बाद २४७ धावा करता आल्या आणि दिल्लीने १० धावांनी सामना जिंकला.

तत्पूर्वी, २२ वर्षाच्या जेक फ्रेझर-मॅकगर्कने २७ चेंडूत ११ चौकार व सहा षटकारांसह ८४ धावा कुटल्या आणि अभिषेक पोरेलसह (३६) पहिल्या विकेटसाठी ७.३ षटकांत ११४ धावा फलकावर चढवल्या. शे होप (४१) व रिषभ पंत (२९) यांनी तिसऱ्या विकेटसाठी २४ चेंडूत ५४ धावा जोडल्या. रिषभ व त्रिस्तान स्तब्स जोडीने २७ चेंडूत ५५ धावांची फटकेबाजी केली. स्तब्सने २५ चेंडूत सहा चौकार व दोन षटकारांसह ४८ धावा करून संघाला चार बाद २५७ धावांवर पोहचवले. दिल्लीच्या या आयपीएलमधील सर्वोच्च धावा ठरल्या. यापूर्वी २०११मध्ये पंजाबविरुद्ध ४ बाद २३१ धावा केल्या होत्या.

# सिकंदर रझाची आयपीएलमधून माघार

**चंदिगड : वृत्तसंस्था**

पंजाब किंग्सचा अष्टपैलू खेळाडू सिकंदर रझा याने आयपीएलमधून माघार घेतली आहे. सिकंदरने एक पोस्ट करीत ही घोषणा केली. राष्ट्रीय कर्तव्यासाठी म्हणजे झिम्बाब्वेसाठी क्रिकेट खेळणार असल्याने पंजाब संघ सोडत असल्याचे त्याने म्हटले आहे. त्यामुळे रझा आता यंदाच्या



आयपीएलचा भाग असणार नाही.

झिम्बाब्वे संघ ३ मेपासून बांगलादेशच्या दौऱ्यावर आहे. या दौऱ्यादरम्यान संघ आगामी टी-२० वर्ल्डकपची तयारी करणार आहे तसेच पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. त्यात सिकंदर रझा झिम्बाब्वे टी-२० संघाचा कर्णधार आहे. त्यामुळे त्याने सोशल मीडियाच्या माध्यमातून एक पोस्ट करीत आयपीएल आणि पंजाब किंग्ज संघ सोडल्याची माहिती दिली.

# तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारतीयांचा डंका!

## पुरुष आणि महिला कंपाऊंड संघांनी जिंकले सुवर्णपदक

**शांघाय : वृत्तसंस्था**

तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारतीयांचा डंका पाहिला मिळत आहे. भारतीय पुरुष आणि महिला कंपाऊंड संघांनी चमकदार कामगिरी करीत सुवर्णपदक जिंकले आहे.

भारतीय महिला कंपाउंड संघाने इटलीचा २३६-२२५ असा पराभव केला. ज्योती सुरेखा वेन्नम, अदिती स्वामी आणि प्रनीत कौर या भारतीय त्रिकुटाने सहाव्या मानांकित इटलीचा



मोठ्या फरकाने पराभव केला. सहा बाणांच्या पहिल्या सेटमध्ये ज्योती, अदिती आणि प्रनीत यांनी केवळ दोनदा १० गुण गमावले आणि या तिघांनी मार्सेला टोनिओली, इरेन फ्रँचिनी आणि एलिसा रोहनर या इटालियन त्रिकुटावर सुरुवातीला १७८-१७१ अशी आरामदायी आघाडी घेतली. शेवटी भारतीय खेळाडूंनी दोन गुण गमावले, परंतु त्याचा फारसा फरक पडला नाही आणि त्यांनी ११ गुणांच्या फरकाने सुवर्णपदक जिंकले.

पुरुष संघात अभिषेक वर्मा, प्रियांश आणि प्रथमेश एफ यांनी नेदरलँड्सचा २३८-२३१ असा पराभव केला. नेदरलँड संघात माइक श्लोसर, सिल पीटर्स आणि स्टीफ विलेम्स यांचा समावेश होता.

# टी-२० वर्ल्डकपमध्ये सूर्यकुमार, बुमरावर भारताचे भवितव्य

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सूर्यकुमार यादव आणि जसप्रीत बुमरा यांच्यावर ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताचे भवितव्य अवलंबून असणार आहे, असे मत माजी सुपरस्टार खेळाडू युवराज सिंग याने व्यक्त केले.

२००७मध्ये पहिल्यावहिल्या ट्वेन्टी-२० विश्वकरंडक स्पर्धेत विजेतेपद मिळवलेल्या भारतीय संघाचा सदस्य असलेला युवराज सिंग म्हणाला की, यंदाच्या ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत सूर्यकुमारचा फॉर्म भारतासाठी महत्त्वाचा असणार आहे तसेच बुमराकडून सर्वोत्तम गोलंदाजी होणे आवश्यक आहे.

सूर्यकुमार ज्या पद्धतीने खेळतो ते पाहता तो किमान १५ चेंडूंत सामन्याला निर्णायक कलाटणी देऊ शकतो. त्याचे जास्त वेळ खेळपट्टीवर असणे हे संघाला विजयाजवळ नेणारे ठरू शकते. म्हणूनच सूर्या भारतासाठी मोलाचा खेळाडू असे शकेल, असे युवराजने म्हटले आहे.

जेवढा सूर्यकुमार महत्त्वाचा तेवढाच मौल्यवान बुमराही आहे. त्याचा एखादा स्पेल भारताला विजयी मार्गावर नेणारा ठरू शकेल, असे सांगणारा युवराज युझवेंद्र चहल हा लेगस्पिनर गोलंदाजही संघात

### युवराज सिंगचे मत



असणे गरजेचे असल्याचे म्हणाला.

दिनेश कार्तिक आयपीएलमध्ये चांगल्या फॉर्ममध्ये खेळत आहे, परंतु या ३९ वर्षीय खेळाडूला आता संघात निवडणे योग्य नाही. त्याऐवजी पहिल्या पसंतीचा यष्टीरक्षक म्हणून रिषभ पंत आणि त्यानंतर संजू सॅमसन यांना संधी द्यायला हवी, असे युवराजने म्हटले. शिवम दुबेला भारतीय संघात खेळताना मला पहायचे आहे. तो 'गेमचेंजर' आहे, असेही त्याने नमूद केले.

ही विश्वचषक स्पर्धा रोहित आणि विराट कोहलीसाठी अखेरची टी-२० स्पर्धा किंवा मालिका असेल, अशी चर्चा केली जात आहे; परंतु हे दोन्ही फलंदाज महान आहेत. त्यांनी कधी निवृत्त व्हावे हे ठरवणे त्यांचा अधिकार आहे, पण कसोटी आणि एकदिवसीय प्रकारावर अधिक लक्ष देण्यासाठी या दोघांनी टी-२० प्रकार बाजूला ठेवावा, असा सल्ला युवीने दिला.

# कॅरम स्पर्धेत पौरस, समृद्धी उपांत्य फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**

खालसा कॉलेजचा पौरस करगुटकर, मॉडेल कॉलेज-डोंबिवलीची समृद्धी घाडीगावकर, पोद्दार कॉलेजची रुची माचीवले व हिंदुजा कॉलेजचा निलांश चिपळूणकर यांनी श्री नारायण गुरू कॉलेज ऑफ कॉमर्स-चेंबूर व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित विनाशुल्क आंतर कॉलेज एकेरी कॅरम स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. सरळ जाणाऱ्या सोंगट्याचे सातत्य व निर्णायक क्षणी अचूक फटके साधणाऱ्या पौरस करगुटकरने महाराष्ट्र कॉलेजच्या साहिल शेखचे आव्हान १९-५, २१-२ असे उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आणले.

चेंबूर पश्चिम येथील श्री नारायण गुरू कॉलेज-जिमखान्यातील दुसऱ्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात पोद्दार कॉलेजच्या रुची माचीवलेला विजयासाठी पोद्दार कॉलेजच्याच शुभम विनेकरने तिसऱ्या सेटपर्यंत २२-०, १२-१३, १३-५ असे झुंजविले. राणीवर वर्चस्व राखणाऱ्या डॉ. टोपे कॉलेजच्या अंकित मोहितेला मॉडेल कॉलेजच्या समृद्धी घाडीगावकरने दोन्ही सेट ७-४, ८-० असे जिंकताना निर्णायक बोर्डाच्या अखेरीस अप्रतिम खेळ केला.

हिंदुजा कॉलेजच्या निलांश चिपळूणकरने भवन्स कॉलेजच्या फरदीन खानचा ८-६, १३-० असा सहज पराभव करतांना डावपेचात्मक खेळ केला. फरदीन खानने सुरुवातीलाच ६-० अशी आघाडी घेतल्यानंतर निलांशने पुढील एकही बोर्ड प्रतिस्पर्ध्याला न देता वर्चस्व राखले. समृद्धी घाडीगावकरविरुद्ध निलांश चिपळूणकर व पौरस करगुटकरविरुद्ध रुची माचीवाले अशा उपांत्य फेरीच्या लढती होतील.

















**उरण : मावळ मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ शनिवारी उरण भेट दौरा आणि बाईक रॅलीचे आयोजन आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. त्यास पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.**

जीवेत् शरदः शतम्!
विक्रम पवार
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
संदेश नाईक

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com